वर्ष : सोळावे
जून २०२४
अंक : सहावा
मूल्य २० रुपये
पृष्ठसंख्या ५६

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

गेली अनेक शतकं आपला शेजारी असलेल्या
चीनबरोबरचे आपले संबंध विलक्षण गुंतागुंतीचे.
चीन जितका आधुनिक, तितकाच ऐतिहासिकही.
आजही भारताबरोबरचा संघर्ष असेल वा अमेरिकेशी स्पर्धा -
चिनी सत्ताधीश आपली धोरणं ठरवताना
इतिहासात दडलेल्या सूत्रांचा आधार घेत असतात.
हे चकित करणारं विलक्षण चिनी प्रारूप समजावून देणारं -



एका सच्च्या समाजवाद्याचं उदास, चिंतनशील स्वगत.

अनेक अंतर्विरोधांनी ग्रासलेलं भारताचं बहुआयामी समाजजीवन चंद्रशेखरांनी पुस्तकात सजीव केलंय.

'जागतिकीकरणाच्या वावटळीत लोकसंस्कृतीची फार मोठी पडझड झाली.' असं ते म्हणतात.

पुस्तकात चंद्रशेखर म्हणतात,
'राजकारण सत्यावर चालत नाही हेच खरं.'

**अंबरीश मिश्र**



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
तृप्ती देशपांडे

वर्ष सोळावे :
अंक सहावा
१५ जून २०२४
मूल्य : ₹ २०/-

अनुक्रम :


- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *सवाष्ण*
  – डॉ. क्षमा गोवर्धने शेलार / ९
- गाऊ त्यांना आरती
  *अग्निपंख* / १९
- चित्र पाहीन आवडी : नितीन हडप / २९
- असे जन्मले पुस्तक!
  *पाषाणाचे पाझर* – विवेक गाडगीळ / ३३
- आठवणींच्या खिडकीतून
  *घर तिघांचं हवं* – श्रीराम रानडे / ३७
- क... कवितेचा : विद्या पोळ-जगताप / ४१
- उद्गार
  *डोईचा पदर आला खांद्यावरी... :*
  *डॉ. छाया महाजन*
  – डॉ. दिलीप धोंगडे / ४३
- राजहंसी पार / ४५
- वाचकांच्या मनातलं... / ४९


या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९/२४४६५०६३.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## 'किमयागार कार्व्हर' वाचून आलेली बाळगोपाळांची खुशीपत्रे

नमस्कार वीणा आजी,

माझं नाव अविनिश आहे. तुम्ही लिहिलेलं पुस्तक किमयागार कार्व्हर मला खूप आवडलं. त्यातून मला काहीतरी शिकायला मिळालं. वैशाली मावशी कडून गोष्ट ऐकताना खूप मजा वाटली. मला पुस्तकातली चित्रे खूप आवडली. मला सर्वात आवडलेलं चित्र म्हणजे पुस्तकाचं कव्हर चे चित्र काढले आहे आणि हे मी तुम्हाला भेट देत आहे.

अविनिश
E-96


4.6.24

वीणा आजी,
धन्यवाद
'किमयागार कार्व्हर' हे
प्रेरणादायी पुस्तक
आमच्यासाठी लिहिल्या
बद्दल.





# संपादकीय

## पर्यावरणाच्या उत्सवाचे नवे-जुने मानकरी आणि कार्व्हर

*आजच्या आपल्या निसर्ग, माती, पाणी यांच्याविषयीच्या गरजा व अडचणी आणि स्वदेशात व परदेशात थोरामोठ्यांनी केलेली कर्तबगारी यांच्या समन्वयातून पुढची पिढी आपल्या समाज आणि देशासाठी काहीतरी विधायक उपक्रम निश्चितपणे घडवू शकेल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करावासा वाटतो.*

जून महिन्यात पर्यावरणाची आठवण आवर्जून होणे स्वाभाविक असते. याचे कारण एकीकडे पाच जून हा दिवस ‘जागतिक पर्यावरण दिन’ म्हणून साजरा केला जातो आणि त्या निमित्ताने विविध कार्यक्रम होतात. परंतु याखेरीज, नैसर्गिक चक्रानुसार नेमेचि येणारा मोसमी पाऊस वेळेवर आणि पुरेसा येणार की नाही, याकडे आपल्या देशाचे आणि आशियाचे लक्ष एकवटण्याची हीच वेळ असते. त्याचे आगमन लांबले, तर साहजिकच पर्यावरणाची हानी होते. त्यामुळे पाऊसकाळ अनियमित व अपुरा तर होणार नाही ना, याबद्दलची चिंतायुक्त चर्चा मोठ्या आवाजात सुरू होते...

एक जूनला ‘राजहंस प्रकाशन’चा वाढदिवसही साजरा होतो. त्यामुळे पाच जूनला सहजच असा विचार मनात आला की, ‘राजहंस’ने पर्यावरण रक्षण-संवर्धन या विषयातील कोणती ग्रंथसंपदा वाचकांकडे सोपविली आहे, या दृष्टीने राजहंसच्या ग्रंथसूचीकडे नजर टाकली; तेव्हा लक्षात आले की, ‘निसर्गायण’ हे श्री. दिलीप कुलकर्णी यांचे पुस्तक सन १९८६मध्ये राजहंसने प्रसिद्ध केले. म्हणजे तब्बल ३८ वर्षांपूर्वीपासून ‘राजहंस’ या क्षेत्रासंबंधी जागरूक आहे आणि जागरूकता निर्माण करायच्या प्रयत्नात आहे. ‘निसर्गायण’ला लाभलेल्या चांगल्या प्रतिसादानंतर दिलीप कुलकर्णी यांचीच ‘हसरे पर्यावरण’, ‘दैनंदिन पर्यावरण’, ‘सम्यक विकास’, ‘सौर आरोग्य’, ‘बदलू या जीवनशैली : भाग एक, भाग दोन व भाग तीन’, ‘ऊर्जा संयम’, ‘भूतान आणि क्यूबा’ अशी आणखी नऊ पुस्तके राजहंसने प्रकाशित केली. त्याखेरीज ‘हरित साधक’ या पुस्तकाचे ते समन्वयक होते. त्यांचे ताजे पुस्तक ‘तंत्र-मुक्ती’ याचे अगदी नुकतेच लोकार्पण झाले आहे. त्यातही त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानामुळे होणाऱ्या पर्यावरणावरील घातक परिणामांचे परखड परीक्षण केले आहे. पर्यावरणाविषयी आस्थेने लिहिणारा हा गुणवत्ताप्राप्त आणि लोकप्रिय लेखक आहे.

भौतिक विकास आणि त्याचा पर्यावरणावरचा परिणाम यांचे चिकित्सक अभ्यासक, ज्येष्ठ शास्त्रज्ञ श्री. माधवराव गाडगीळ आणि श्री. अतुल देऊळगावकर यांचाही मोलाचा हातभार राजहंसच्या या प्रयत्नांना लाभला आहे. 'पृथ्वीचे आख्यान' व 'निसर्गकल्लोळ' या अतुल देऊळगावकरांच्या पुस्तकांना समीक्षक/परीक्षक व वाचक या सर्वांची दाद मिळत आहे. म्हणजे शास्त्रीय अभ्यास आणि जीवनशैली या दोन्ही अंगांनी पर्यावरणस्नेही असण्याचा मंत्र 'राजहंस'ची ही पुस्तके देतात. ही सगळी पुस्तके तरुण व प्रौढ वाचकांसाठी असली, तरी बालवाचकांनाही पर्यावरणाशी मैत्री करायची प्रेरणा देणे अगत्याचे आहे हे समजून, राजहंसने आपल्या बालसाहित्य प्रकल्पात पर्यावरणाशी निगडित विषयांवर एक-दोन नव्हेत, तर थेट १७ इतक्या छोट्या पुस्तकांची भेट विविध वयोगटांच्या मुलांना दिली. यांतली काही पुस्तके मराठीप्रमाणेच इंग्लिश अनुवादाच्या स्वरूपातही उपलब्ध आहेत, हे विशेष.

तर मग पर्यावरणविषयक पुस्तके ही गेल्या चार दशकांतलीच कामगिरी आहे असे म्हणता येईल का? या प्रश्नापाठोपाठ आठवण झाली ती जगप्रसिद्ध कृष्णवर्णीय अमेरिकन शास्त्रज्ञ जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांची. त्यांचे सुरेख, समग्र चरित्र वीणा गवाणकर यांनी लिहिले आणि राजहंसने प्रसिद्ध केले ते जानेवारी १९८१मध्ये, म्हणजे ४३ वर्षांपूर्वी. मराठी चरित्रांमध्ये सेलिब्रिटी ठरलेल्या या चरित्रपुस्तकाची अठ्ठेचाळिसावी आवृत्ती सध्या उपलब्ध आहे! पण थोड्या मोठ्या आकाराचे आणि १८४ पानांचे हे चरित्र प्रौढ वाचकांना जास्त भावणारे आहे, हे स्वाभाविक आहे. वाचकांच्या तीन पिढ्यांनी ते आवडीने वाचले आणि यानंतरही वाचत राहतील. पण पुढे मागणी अशी आली की 'मराठी वाचनाची गोडी थोडीशी कमी झालेल्या अलीकडच्या पिढीलाही कार्व्हर यांच्या कार्यकर्तृत्वाची ओळख करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी, वीणाताईंनीच कार्व्हर यांचे थोडेसे आटोपशीर आणि ललित चरित्र खास बाल-किशोर-कुमार गटांतल्या वाचकांसाठी लिहावे.' याला प्रतिसाद म्हणून जन्म झाला, तो 'किमयागार कार्व्हर' या फक्त ८८ पानांच्या आकर्षक चरित्राचा. पण या सगळ्या मुद्द्यांचा पर्यावरणाशी काय बरे संबंध? जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांच्या अमेरिकेत, म्हणजे दीडशे वर्षांपूर्वीच्या काळात आधुनिक पर्यावरणवाद अस्तित्वात तरी आला होता का? याचे उत्तर अर्थातच 'नाही' असे आहे. आज ज्या अर्थाने अनेक सुबुद्ध नागरिक स्वतःला पर्यावरणवादी म्हणून घेतात आणि विविध संस्था-संघटनांद्वारे पर्यावरणाच्या रक्षण-जतन-संवर्धनासाठी लोकजागृती करतात, तसेच सक्रिय प्रयत्न करतात; तशी कोणतीच स्थिती महान वनस्पतिशास्त्रज्ञ कार्व्हर यांच्या काळी अस्तित्वात नव्हती. आणि तरीही ते विचाराने, वाचेने आणि कृतीने पर्यावरणाला वाहून घेतलेले थोर वैज्ञानिक होते. त्यांनी नेमके काय काय कार्य केले, हे तपशिलात जाऊन जाणून घ्यायला हवे आणि त्यासाठी वीणा गवाणकर

लिखित या दोन चरित्रांपैकी किमान एक (खरे तर दोन्ही!) निश्चितपणे पूर्ण वाचायला हवे. परंतु एखादेच उदाहरण द्यायचे झाले, तर अमेरिकेतील अलाबामा या राज्यात, जंगलतोड आणि जमिनीची धूप झाल्यामुळे निसर्गसंपत्ती संपत आली होती. मुळात सुपीक जमीन आणि हिरव्यागार निसर्गाने नटलेल्या या राज्याचा मोठा भूप्रदेश उजाड, वैराण होण्याच्या मार्गावर होता. शेतजमिनीचा कस कमी झाल्यामुळे तिची उत्पादनक्षमताही संपत आली होती. जमीन नापीक झाल्यामुळे उपासमारीची वेळ येऊन ठेपली होती. अशा बिकट संकटाच्या प्रसंगी कार्व्हर यांनी एखाद्या जादूगाराप्रमाणे शास्त्रीय संशोधनाद्वारे उपाय शोधले. ते स्वत: शेतीत राबून अमलात आणून दाखवले आणि त्याद्वारे दुष्काळ, भूक, नापिकी अशा संकटांची परिस्थिती पूर्णपणे पालटवून टाकून अलाबामा हे राज्य पूर्वीसारखे हिरवेगार करून दाखवले. यासाठी त्यांनी सर्वसामान्य, ग्रामीण, गरीब जनतेला विश्वासात घेतले आणि वैज्ञानिक शोधक दृष्टीचे व्यावहारिक फायदे त्यांच्यापर्यंत पोहोचवले. त्या अर्थाने जीनियस शास्त्रज्ञ जॉर्ज कार्व्हर हे आद्य पर्यावरणवादी किंवा किमान पर्यावरणवाद्यांच्या पहिल्या पिढीचे आघाडीचे प्रतिनिधी मानले जावेत, अशी त्यांची योग्यता आहे. आज आपल्या देशातही शेतजमिनीच्या आणि पाण्याच्या अनेक समस्या उभ्या राहत असताना कार्व्हर यांची ही संपूर्ण आणि संक्षिप्त अशी दोन्ही चरित्रे वाचकांनी आवर्जून संग्रही ठेवावीत आणि वाचावीत अशी त्यांची उपयुक्तता आहे. यातील 'किमयागार कार्व्हर' या संक्षिप्त चरित्राचा इंग्लिश अनुवाद राजहंसनेच 'जॉर्ज कार्व्हर द मॅजिशियन' या नावाने प्रकाशित केला आहे. इंग्लिश माध्यमात शिकणारे मराठी वाचक आणि अमराठी बाल-किशोर-कुमार वाचक यांच्या सोयीसाठी केलेल्या या इंग्लिश अनुवादाचे एक वैशिष्ट्य म्हणजे, त्याच्या शेवटच्या पानावर दिलेला क्यूआर कोड स्कॅन केला, तर पुस्तकातील काहीशा अवघड इंग्रजी शब्दांचे अर्थ आणि मुलांची इंग्रजी भाषेतील क्षमता वाढविण्यासाठीची प्रत्येक प्रकरणावरची काही प्रश्नोत्तरे असा विशेष खजिनाही वाचकांना (अर्थातच विनामूल्य) उपलब्ध होईल. ही सुविधा इंग्रजी अनुवादाची मूल्यवृद्धी (व्हॅल्यू ॲडिशन) म्हणता येईल.

कार्व्हर यांचे अचाट कार्यकर्तृत्व आणि वीणा गवाणकर यांची रसाळ लेखणी यांना समर्थ साथ मिळाली आहे ती माधुरी पुरंदरे यांच्या उत्कृष्ट चित्रसजावटीची. सगळ्यांनी समरसून काम केले, तर त्याचा परिणाम किती उत्कट होऊ शकतो, याचा उत्तम नमुना म्हणजे 'किमयागार कार्व्हर' आणि 'जॉर्ज कार्व्हर द मॅजिशियन' ही दोन पुस्तके. वाचकांना ती कशा तऱ्हेने भिडत आहेत, याचे काही नमुने याच अंकात पृष्ठ क्रमांक ४वर दिले आहेत. एका बालवाचकाला तर माधुरीताई पुरंदरे यांनी रेखाटलेले मुखपृष्ठ इतके आवडले, की त्या धर्तीचे चित्र स्वत:च रेखण्याचा प्रयत्न त्याने केला आहे. ग्रामीण भागातील या शाळकरी विद्यार्थ्याने

मनापासून दिलेली ही दाद मूळ चित्रकर्तीलाही भावेल अशीच हृद्य आहे. काही बालवाचकांनी उत्स्फूर्तपणे दिलेले अभिप्रायही वाचण्यासारखे आहेत. मराठी व इंग्लिशमधील कार्व्हर चरित्रपुस्तके शिक्षकांनी मुलांना वर्गात अवांतर वाचन म्हणून वाचून दाखवली अशी उदाहरणेही कानावर येत आहेत, याचा मोठाच आनंद वाटतो.

आजच्या आपल्या निसर्ग, माती, पाणी यांच्याविषयीच्या गरजा व अडचणी आणि स्वदेशात व परदेशात थोरामोठ्यांनी केलेली कर्तबगारी यांच्या समन्वयातून पुढची पिढी आपल्या समाज आणि देशासाठी काहीतरी विधायक उपक्रम निश्चितपणे घडवू शकेल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करावासा वाटतो.

***शिरीष सहस्रबुद्धे,*** 'राजहंस' संपादक


मुलीचं लग्न होतं, तेव्हा तिचं जीवन समूळ बदलतं; हे सर्वमान्य!
पण ती एकटीनं, स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेते, तेव्हा?
तिचं जीवन कसं बदलतं? काय होतं?
स्वत:च्या निर्णयानं, स्वतंत्रपणे, एकल राहणाऱ्या
स्त्रीचं आत्मकथन.




विवाह नाकारताना

विनया खडपेकर

किंमत : ₹ ४३०/- । (ट.ख. ₹ ५०)

निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार, मानवी स्वभावातील अतर्क्य भावनाट्य किंवा जीवनाच्या एखाद्या प्राणसूत्राचं स्वत:ला नि:संदर्भ होऊन करून केलेलं आत्मचिंतन. एखाद्या संवेदनशील स्त्रीनं आपल्या जाणत्या सखीला कधी मनोगत तर कधी हृद्गत सांगावं, तसा आशय सांगणारा लेखसंग्रह...




गोंदणखुणा

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३००/- । (ट. ख. ₹ ५०)

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## सवाष्ण

*‘सवाष्ण’ ही कादंबरी ‘राजहंस’ने नुकतीच प्रकाशित केली.*
*रवींद्र गुर्जर यांनी या कादंबरीसाठी लिहिलेली प्रस्तावना आणि या कादंबरीच्या लेखिका डॉ. क्षमा गोवर्धने शेलार यांनी करून दिलेला कादंबरीचा हा परिचय.*

अमृतमहोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या ‘राजहंस प्रकाशना’ने दोन लेखन स्पर्धा जाहीर केल्या.

१. रहस्य-सन्मान कादंबरी स्पर्धा

२. कुमार विज्ञान कादंबरी स्पर्धा

यांपैकी ‘रहस्य’ गटातील पारितोषिकप्राप्त पहिल्या दोन कादंबऱ्या नुकत्याच प्रकाशित झाल्या. डॉ. क्षमा गोवर्धने शेलार लिखित ‘सवाष्ण’ आणि राधिका कुलकर्णी लिखित ‘द सीक्रेट मिशन’ या कादंबऱ्यांना अनुक्रमे पहिला आणि दुसरा पुरस्कार मिळाला आहे. या दोघींचे मन:पूर्वक अभिनंदन!

साप्ताहिक ‘माणूस’ आणि ‘राजहंस प्रकाशना’ने आपल्या कारकिर्दीत अनेक लेखमाला, स्पर्धा, योजना इ. यशस्वीरीत्या सादर केल्या. प्रथितयश लेखक तर होतेच; त्याचबरोबर नवीन लेखक घडवले, त्यांना प्रोत्साहन दिले. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, वि. ग. कानिटकर, विजय तेंडुलकर, अनंत भावे, रवींद्र पिंगे, अरुण साधू, अनिल बर्वे आदी थोर लेखकांची परंपरा असलेल्या ‘राजहंस’च्या यादीत नाव समाविष्ट होणे खरोखरच गौरवास्पद आहे. दोन्ही लेखिकांना याचा निश्चितच अभिमान वाटेल.

रहस्यकथा स्पर्धा ज्यांच्या सन्मानार्थ घोषित केली होती, ते श्री. बाबुराव अर्नाळकर आणि श्री. गुरुनाथ नाईक यांच्याबद्दल थोडे सांगणे उचितच होईल. दोघांनीही हजारच्या वर कादंबऱ्या लिहिल्या. सन १९६०च्या पूर्वोत्तर त्यांचा चाहता असलेला लाखोंचा वाचकवर्ग महाराष्ट्रात निर्माण झाला. दरमहा प्रसिद्ध होणाऱ्या नव्या पुस्तकांची लोक चातकासारखी वाट बघत असत. (त्यातला एक मीही होतो.) परीक्षेच्या काळातही विद्यार्थी चोरून त्यांचे वाचन करत.

अर्नाळकरांनी ‘चार आणे माला’मधून लेखनाची सुरुवात केली. झुंजार, काळा पहाड, धनंजय-छोटू, दर्यासारंग, मेजर सुदर्शन हे त्यांचे कथानायक विलक्षण गाजले.

त्यांना ९० वर्षांचे दीर्घायुष्य (सन १९०६ ते १९९६) लाभले. गुरुनाथ नाईक महिन्याला चार-पाच पुस्तके सहज लिहीत. त्यांनी सैनिकी जीवनावर सुमारे अडीचशे शिलेदार कथा लिहिल्या. गरुड, गोलंदाज, शब्दवेधी, कॅप्टन दीप आदी व्यक्तिरेखा त्यांनी अजरामर केल्या. वयाच्या ८४व्या वर्षी त्यांचे पुण्यात दीर्घ आजाराने निधन झाले. त्या आधीचा बहुतांश काळ ते गोव्यात राहत होते.

या दोन्ही तुफान लोकप्रिय रहस्यकथा लेखकांची पुस्तके (छोट्या क्राऊन आकाराची) साधारण शंभर पानी असत. राज्यातल्या सर्व ग्रंथालयांमधून ती त्वरित उपलब्ध होत. किमान पाच हजार प्रतींचा खप निश्चित असे. त्या दोघांना विनम्र अभिवादन.

आता, पुरस्कारप्राप्त दोन पुस्तकांबद्दल थोडेसे.

प्रथम क्रमांकाची, डॉ. क्षमा गोवर्धने शेलार लिखित 'सवाष्ण' ही भरघोस ४८ प्रकरणे असलेली सुमारे २४० पानांची कादंबरी आहे. एका मोठ्या कुटुंबाची उत्कंठावर्धक नाट्यमय कहाणी. राधिका कुलकर्णी यांच्या 'द सीक्रेट मिशन'ला दुसरा क्रमांक मिळाला आहे. सुमारे १६० पानांच्या १९ प्रकरणांमधून त्यांनी कुतूहल वाढवत 'रहस्य' उलगडले आहे. ही काहीशी नाईक-अर्नाळकरी बाजाची कथा म्हणता येईल. लेखनस्पर्धेच्या निमित्ताने दोन चांगल्या लेखिका प्रकाशात आल्या आहेत.

'सवाष्ण' कादंबरीचा पट फार मोठा आहे. अनेक व्यक्तिरेखा आणि घटनांनी भरलेला आहे. खेड्यातला एखादा मोठा वाडा समोर आणा. पंचक्रोशीत मानसन्मान असलेली वजनदार, वतनदार माणसे तिथे राहतात. घराभोवती फळाफुलांची बहरलेली बाग आहे. शेतीवाडीही भरपूर. वर्षानुवर्षे निष्ठेने काम करणारे नोकरचाकर आहेत. मूळपुरुष असल्याप्रमाणे एक नाग मधूनच आश्वासक दर्शन देतो. हे सर्व असूनही घराण्याला एक शाप मिळालेला आहे. घरातल्या कर्त्या, सवाष्ण स्त्रिया अल्पायुषी ठरतात. त्यांच्या मागे इतरांना सण-समारंभ, लग्नकार्ये, बाळंतपणे असा सर्व डोलारा सांभाळावा लागतो. लेखिकेने मोठ्या कौशल्याने त्याचे जिवंत चित्रण





एका सर्वसामान्य माणसाचा अनघड प्रवास. अनेकांना अडचणीतून मार्ग दाखवणारा, दिशाहीन वा नाउमेद झालेल्या तरुणाईला दिलासा मिळेल या विश्वासाने केलेला...

फकिरी

एक अनघड प्रवास...

दत्ता बारगजे

किंमत : ₹ ३९५/- । (ट. ख. ₹ ५०)

केले आहे. आपण त्यात गुंतत जातो आणि पुढे काय घडणार, शाप का लागला, त्याचे निराकरण कोण करणार, कसे होणार याची उत्सुकता लागते. अर्थात, हे पुस्तक मुळातून वाचणे ही आपलीच जबाबदारी.

'द सीक्रेट मिशन' या दुसऱ्या पुस्तकाकडे वळू. एका छोट्या गावात एक तरुण, तडफदार इन्स्पेक्टर धनेश नव्याने कामावर रुजू होतो. प्रतिष्ठित गावकरी त्याचा लगेच सत्कार करतात. त्याच्यावर काही विशेष कामगिरी सोपवलेली असते का? तो बेपत्ता व्यक्तींच्या 'पेंडिंग फाइल्स'चा अभ्यास सुरू करतो. त्यामुळे तिथले सबइन्स्पेक्टर मांडके अस्वस्थ होतात. लॉज मिळेपर्यंत धनेश हा जगदाळे नावाच्या हेड कॉन्स्टेबलच्या घरी मुक्काम करतो.

गावाचा फेरफटका मारताना त्याला एक प्राचीन शिवमंदिर दिसते. त्याच्याविषयीच्या आख्यायिकाही समजतात आणि एक-एक करून रहस्यमय घटना घडू लागतात. एक तरुण मुलगी बेपत्ता होते. एक अज्ञात व्यक्ती पाळतीवर असल्याप्रमाणे अधूनमधून दर्शन देते. ज्या काही व्यक्ती जुन्या काळी अचानक अदृश्य झालेल्या असतात, त्यात प्रामाणिक सबइन्स्पेक्टर सावंत यांचाही समावेश असतो. या सर्व गोष्टींचा छडा लावणे, हेच धनेशपुढचे आव्हान असते. दुसरीकडे जगदाळ्यांची सुंदर मुलगी त्याच्या मनात भरते. तिच्याही अपहरणाचा प्रयत्न होतो, पण धनेश तिला वाचवतो. एक डायरी अचानक त्याच्या हाती लागते. मंदिराच्या पुजाऱ्याची भेट झाल्यावर तिथेच काही रहस्य दडले असावे, असा संशय त्याला येतो. त्याचे गुप्त 'मिशन' अखेर यशस्वी होणार का? हेच तर आपल्याला या पुस्तकात वाचायचे आहे.

बक्षीसपात्र दोन्ही पुस्तके दर्जेदार आणि उत्कंठावर्धक आहेत. डॉ. क्षमा गोवर्धने शेलार आणि राधिका कुलकर्णी या दोघींना यापुढील साहित्य-निर्मितीसाठी भरपूर शुभेच्छा.

***रवींद्र गुर्जर***


मानवी भावभावनांची आणि पर्यायाने मानवी वर्तनाची
पाळेमुळे मेंदूत असली पाहिजेत,
या विज्ञानाच्या विचारधारेला बळकटी देणारे,
मेंदूविज्ञानाबद्दल कुतूहल जागृत करणारे

आपले वर्तन ↔ आपला मेंदू

डॉ. आनंद जोशी / सुबोध जावडेकर

किंमत : ₹ ४४०/- । (ट.ख. ₹ ५०)



# सवाष्ण

'मुंगसा मुंगसा, तोंड दाखव, तुला रामाची शपथ.
मुंगसा मुंगसा, तोंड दाखव, तुला रामाची शपथ.'

विजू मनोभावे पुटपुटत होता. त्याच्यासोबत आलेली लहानखुरी लता त्याने दटावल्यावर काहीशी बावरून तेच म्हणत होती. इतक्यात तिच्या पायाजवळून काहीतरी सळसळत गेल्याची तिला जाणीव झाली. ती एकदम घाबरून म्हणाली, ''विजू ! चल माघारी, हितं साप हाये.''

विजू मुंगसाच्या मागावरची नजर न हटवता म्हणाला, ''हो.. लाल-लाल गुंजेसारख्या डोळ्यांचा, काळ्याभोर रंगाचा, तुकतुकीत अंगाचा आहे तो. घाबरू नको त्याला. आमच्या घराण्याचा मूळपुरुष आहे तो. आमच्या घराण्याची राखण करतो.''

लता अजूनही भेदरलेली होती. इतक्यात कसं कोण जाणे, आंब्याच्या झाडावरचं आग्यामोहोळ घों-घों करत उठलं. झाडावरची वानरं घाईनं इकडंतिकडं पांगली. लता आणि विजू घाबरून वाड्याच्या अंगणाकडं पळत सुटले. त्या झंझावातात होलपटला गेलेला वाडा दुर्गाआजीच्या कठोर शब्दांनी थरारून उठला...

''सखुबाई! जा घेऊन तुमच्या त्या वाणदवड्या नातीला. एक दिवस आली तर कहर केला वाड्यात. नाहीतरी पुरुषधार्जिण्या नाहीच तुम्ही बायका... निघा...''

सखुबाईच्या काळजाला गरम डावानं चर्रकन चटका दिल्यासारखं झालं. तिनं आपल्या तळव्यांकडं हताश नजरेनं पाहिलं. आयुष्यभर कष्ट करून हाताच्या रेषासद्धा मिटून गेलेल्या हातांना कुणा पुरुषाचं रक्त लागलं बरं??? ती विचारच करत राहिली.

सगळ्या रस्त्यानं माश्या चावल्यामुळे चेहरा सुजलेल्या लताला रेमटवत घरी घेऊन आली.

....रागावलेली सुरखी सखुबाईला करवादून म्हणाली, ''त्या वाड्यातल्या म्हातारीला तुझ्यासंगं भांडाया कसं पटलं बरं? आन् तिचा तो वाडा दोन पिढ्यांपास्नं सवाशिनींचा घास घेतोय त्याचं काय?''

सुरखीच्या तडतडीकडे सखुबाईचं लक्षच नव्हतं.. तिला आठवत होता तो घरंदाज वैभव अंगोपांगी बाळगत नटलेला, सालंकृत लक्ष्मीसारखा दिसणारा देखणा वाडा...

वाड्याच्या आवाराबाहेरची गोरखचिंच, भलाथोरला दिंडीदरवाजा, मोठं अंगण, दगडी तुळशी वृंदावन, त्यातली दवनाती गरती तुळस, तिचा गारेगार हिरवा डेरा... तिच्या उजवीकडे कडुनिंब, डावीकडे पारिजातक. त्यापलीकडे डोकावलं, की दगडी फरसबंदीत शोभिवंत दिसणारी दगडी विहीर.. तिच्यावरचा लाकडी रहाट, पोहोऱ्यासाठीची चकचकीत पितळी बादली. खास धुणं धुण्यासाठी असणारा

चौकोनी दगड. शेजारी उघड्यावरच असणारं पुरुषांसाठीचं न्हाणीघर. तिथं ठेवलेलं तांब्याचं मोठं घंगाळ आणि तांब्याचाच गडू.

वर्षाकाठी चांभार येई. जुन्या मोटेच्या चामड्यापासून नवीन चपला करून देई. सुतार येऊन शेतीची अवजारं, लाकडी बाजा, जात्यावरचे खुंट नीट करून देई. दिवाळसणाला कासार येई. शेतावरच्या गडीमाणसांच्या बायकांचा, तसंच वाड्यावरच्या लेकीबाळींचा सगळा जथा छनछन करीत त्याच्याकडून बांगड्या भरून घेई. हलकंसं स्मितसुद्धा पदराआड लपे. नजर वर करून बायामाणसांच्या चेहऱ्याकडं बघण्याची कासाराची काय बिशाद!! नानासाहेबांनी नुसता घसा खाकरला, तरी त्याचं पाणी-पाणी होत असे. वाड्यातल्या पोराटोरांना भाषा आणि अंकगणित शिकवायला म्हणून तालुक्याच्या गावचा मास्तर येत असे. पावकी, निमकी, पाढे, परवचे कसं एका सुरात म्हणायला शिकवी. पुस्ती काढणं घोटून घेई.

सणासुदीला वाडा झेंडूच्या फुलांनी, आंब्याच्या पानांच्या तोरणांनी सजवला जाई. तीन गोठ्यांतल्या खिल्लारांची पूजा होई. वतनात मिळालेल्या घोड्यांची पूजा होई.

माजघराचं वैभवही काही कमी नव्हतं. एका पंगतीला पन्नास माणसं सहजी जेवतील इतकी तांब्या-पितळेची हरएक प्रकारची भांडी होती. ठेवणीतली सोन्या-चांदीची भांडी तर कितीक होती. चुलीच्या बरोबर वर असलेल्या कौलारू छताला काचा बसवलेल्या होत्या. त्यामुळे बैठक खोली, ओटी, व्हरांडा असं सगळं ओलांडून आत जावं लागलं; तरी माजघर कधी अंधारात नसायचं.

त्या प्रकाशात चुलीपुढे अन्न रांधणारी, रेशमी लुगड्यातली हिरानानी साक्षात अन्नपूर्णा भासत असे. छताच्या त्या काचेतून सूर्याचे सप्तरंगी किरण अलवारपणे येत. तांब्या-पितळेच्या भांड्यांच्या चळतीवर दिमाखात चकाकत. कितीही उशीर झाला, तरी झोपण्यापूर्वी आठवणीनं चुलीत निखारा पुरणं आणि स्वस्तिक रेखाटणं नानीनं मरेपर्यंत चुकवलं नाही. हिरानानीच्या आठवणीनं सखुबाईचे डोळे ओलावले. पण तिची विचारशृंखला तुटली नाही.

'नानासाहेबांनी बाजिंदावर डोळा ठेवला नसता, तर हे सगळं पुढचं आकरीत टळलं असतं काय?' सखूबाईनं उसासा टाकला.

'बाजिंदा होतीच तशी. तिच्या नावातच सळसळत्या नागिणीचा भास होई. गौराईच्या मुखवट्यावानी मासळीसारखे डोळे. त्या डोळ्यांमध्ये एक वेगळीच ठिणगी. शिंपल्यासारख्या टप्पोऱ्या पापण्या; नाकाचा शेंडा असा, की जणू देवाघरच्या कारागिरानं हातानं बनवला असावा. टोकदार नाकातल्या नथनीची चमक त्याच्यापुढं फिकी पडे. मशेरीमुळं काळपट, पिवळट पडलेले दात; पण बघणाऱ्याचं काळीज उचंबळून येईल असं जिवघेणं हसू. लांब केसांचा भला नारळाएवढा अंबाडा सोडला, की धबधब्यासारखा केशकलाप तिची भरदार कुडी झाकून टाके.

**अभिनंदन!**

## ‘महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे’ या संस्थेच्या पुरस्कारांचे ‘राजहंसी मानकरी’



गणेश सरस्वती ठाकूरदेसाई
स्मृती पारितोषिक

**ऐसपैस गप्पा नीलमताईंशी**

◆

करुणा गोखले




---



शंकर पाटील
स्मृती पारितोषिक

**संभ्रमाची गोष्ट**

◆

पी. विठ्ठल




---

बँक ऑफ महाराष्ट्र
लोकमंगल मुख्य शाखा
पुरस्कृत अर्थशास्त्र क्षेत्रातील
पारितोषिक



**आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग : हर्षद ते हिंडनबर्ग**

◆

अपूर्वा प्रदीप जोशी



**अभिनंदन!**

## ‘आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी’ या संस्थेच्या पुरस्कारांचे ‘राजहंसी मानकरी’



उत्कृष्ट गद्य
साहित्यकृती

**या जीवनाचे काय करू?**

◆

अभय बंग



---



लक्षणीय गद्य
साहित्यकृती

**निसर्गकल्लोळ**

◆

अतुल देऊळगावकर



---



विनायक श्रीधर देशपांडे
उत्कृष्ट साहित्यकृती

**संभ्रमाची गोष्ट**

◆

पी. विठ्ठल



---



महादेव बाळकृष्ण जाधव
उत्कृष्ट मराठी अनुवाद

**राखेतून उगवतीकडे**

◆

विंग कमांडर अशोक लिमये
अनु. : सोनाली नवांगुळ



'नानाची मती चळली नसती तर नवलच. मूळपुरुष बाजिंदाला डसला नसता, तर नानाचा जीव घेऊन तिचा आत्मा ह्या जन्मात शांत झाला असता. वाड्याच्या सवाशिनी आज जित्या असत्या. दुर्गाबाईचं चित्त खिनभर तरी थीर झालं असतं.. म्हातारीचं त्वांड वायफाटच, पन आपल्याबी पदराला इस्तव बांधलाय ह्ये बी खरंच...' सखुबाईच्या मनात पहाटेपर्यंत वाड्याचेच विचार चालले होते. रात्रभर डोळ्याला डोळा लागला नाही. शेवटी उठलीच ती. तोंडात मशेरी कोंबली आणि मनातल्या सगळ्या मळमळीला एक पिंक टाकून लांबवर पिचकटून दिलं. वाड्याकडे जाण्यासाठी ती आवरू लागली. स्टोव्हला खसाखसा पंप मारणारी सुरखी पुन्हा वैतागली, ''हज्जारदा नाई म्हनले, पन जातीसच तू त्या भुताळ्या वास्तूत... वाड्याशी तर लगीन लागलंय ना तुझं...'' तिनं कितव्यांदा कोण जाणे, सादळलेली गुलकाडी पेटवायचा प्रयत्न केला. स्टोव्हच्या पोटातून येशेल उचंबळत होतं. कसातरी एकदाचा तो 'फर्रर्र' आवाज करत वेडावाकडा पेटला. सुरखी त्याच्याकडं उरातल्या जाळाकडं बघावं तशीच बघत राहिली.

सखुबाईनं तिला काही उत्तर न देता वहाणा घातल्या. तिला जाताना पाहून सुरखीनं स्टोव्हची चावी ढिली केली. आत कोंडलेली हवा 'फस्स' आवाज करत बाहेर आली. सुरखीच्या वांझोट्या वैतागाचा आवाज असल्यासारखीच..

सखुबाईची पावलं भराभर वाड्याच्या दिशेनं निघाली होती. उजव्या पायाच्या चपलेचा अंगठा रडणाऱ्या लतीच्या सुजऱ्या चेहऱ्यासारखाच चालताना मध्येमध्ये येत होता. त्यामुळे तिला अडखळायला होत होतं. कधी एकदा वाड्यात जाईन आणि कामात जिवाचा घोर विखरून टाकीन, असं तिला वाटतं होतं. तिचं इमान दिंडी दरवाज्याच्या उंबऱ्यावरच्या पितळी फुलांसारखं वाड्याशी एकरूप झालं होतं ना..

अभिनंदन!

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे



उद्योजक कृष्णकुमार गोयल पुरस्कृत
कोहिनूर ग्रुपचा
कविवर्य नारायण सुर्वे पुरस्कार

◆

हिमांशु कुलकर्णी

पुढेही अनेक वर्षं तो शिरस्ता ती पाळत राहिली. वाड्याचे उपकार आठवत दुर्गाआजीचे कडू शब्द सगळं पोटात घेणाऱ्या नदीसारखी साहत राहिली.. वाहत राहिली..

मधूनच त्या वाड्याला पडलेल्या वाईट स्वप्नांचे अवशेष तिच्या डोळ्यांत खुपत राहत. जन्माजोगीला पुरून उरलेल्या बाजिंदाचे शेवटचे शब्द मनात धुपत राहत...

'माझा शाप या वाड्याला भवल्याशिवाय राहनार नाई. थडथडा छाती पिटून घ्यायची बारी येईल ह्या वाड्यावर. कुक्कवाचा करंडा तसाच त्वांड वासून पडंल.. घुबडाचं, वटवाघळाचं राज्य येईल.. दिवसाढवळ्या भुतं नाचतीन इथं... ही भुई जोडव्यांचा आवाज ऐकायची नाई..'

हे बाजिंदाचे शब्द तिच्या आणि वाड्यातल्या सगळ्या माणसांच्या खांद्यावर गेल्या काळातल्या कित्येक अमावस्यांपासून वेताळासारखे बसले होते.

*जात्या ईश्वरी तुला*
*सुपारी बांधली*
*मैनाला माझ्या*
*हळद लागली*

*जात्या ईश्वरी*
*फिरं तांदळाचा घाणा*
*मैनाचा नवरा*
*जणू मोतियाचा दाणा*


अभिनंदन!

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे



बालकुमारांसाठी दिलेल्या लेखन योगदानाबद्दल
शांताबाई आणि बाबुराव शिरोळे
पुरस्कार

वर्षा गजेंद्रगडकर

आयाबाया हळदीची गाणी म्हणत होत्या. आज कितीतरी वर्षांनी वाडा हसला होता. वाड्याच्या वंशाच्या एकुलत्या एक दिव्याचं - विजूचं शुभमंगल होणार होतं. वाड्यात नव्या सवाष्णीचं आगमन होणार होतं. तिच्या स्वागतासाठी आसुसून गेलेला वाडा एकीकडे बाजिंदाचा शाप उरीशिरी वागवत उसासत होता. सखू आणि दुर्गाआजीच्या काळजाला तर जशी कसर लागली होती.

लग्नदिवशी वाहणारा वारा आजपावेतो पाहिला नव्हता, अशी जुनी-जाणती माणसं म्हणत होती. आभाळ पुतनेच्या स्तनांसारखं तटतटून आलं होतं. दूरवर क्षितिजाच्या डोळ्यांत विजांचे काटे सलत होते. नियती महाभूत होऊन हसत होती. सगळा आसमंत कोणाच्यातरी करपून गेलेल्या, काळाठिक्कर पडलेल्या संसाराचं प्रतीक वाटत होता. नुकताच नवरा गेलेल्या बाईचं कुंकू पुसावं, अशा निष्ठुरतेनं ढगांनी आभाळातला दिवा गिळून टाकला. वाड्याच्या दरवाजात मोहरीएवढ्या डोळ्यांची, कळकटलेल्या रंगाची पाल क्षीण चुकचुकत होती.

या सगळ्यांपासून अनभिज्ञ असणारी नवी सवाष्ण अंगभर सोनेरी बुट्टी असलेल्या गर्द डाळिंबी साडीत माणकासारखी दिसत होती. अबोलीचा गजरा माळलेली ती अनुपम सुंदर दिसत होती. इतक्या पाहुण्यांसमोर वावरताना गोंधळून गेली होती. पाकोळीसारखी थरथरत होती. गालांवर लाजेनं फुललेले गुलाबी गेंद तिच्या चेहऱ्याला आणखीनच आकर्षक करत होते. सुरईसारख्या निमुळत्या मानेवर कुरळ्या केसांच्या अलवार बटा नाजूकपणे हिंदोळत होत्या. त्यामुळे मुळचीच नक्षत्रखणी ती आणखीनच सुंदर दिसत होती.

तिला पाहून विजूच्या डोळ्यांत कितीतरी स्वप्नं उमलून आली होती. त्याचा स्वत:च्या भाग्यावर विश्वासच बसत नव्हता. तिची रूपं साठवण्यासाठी त्याच्या मनाचं अमर्याद अवकाशही त्याला अपुरं-अपुरं भासू लागलं होतं.

*निमिषमात्रे पाहिला जो हात तो सकवार होता*
*जीवघेणा हाय तरिही वार तो अलवार होता..*

त्याला त्याच्याच ओळी आठवून मंद-मंद हसू येत होतं.

या जिवंत परिकथेला दृष्ट तर लागणार तर नाही ना, म्हणून सखुबाई चिंतेत पडली होती. दुर्गाआजी बाजिंदाच्या नावानं कडकडा बोटं मोडत होती... कुलदेवतेच्या अष्टकात खंड पडू नये म्हणून दक्ष होती.. काळाच्या कराल जबड्यात गरगरत नाहीशा झालेल्या आधीच्या सवाष्णींची सय तिच्या पापणीच्या काठी कशीबशी तोल सावरत उभी होती. 'या नव्या सवाष्णीचं आयुष्य हरळीवानी येली जाऊ दे अन् कापसावानी म्हातारं होऊ दे' म्हणत वाड्याच्या दुर्दैवाशी तंडत होती...

❖




## गाऊ त्यांना आरती

‘भारतरत्न’ हा सर्वोच्च
नागरी सन्मान मिळवलेल्या
कर्तृत्ववंतांची ‘राजहंसी’ चरित्रे

# अग्निपंख

*डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना १९९९ साली ‘भारतरत्न’ या सर्वोच्च नागरिक सन्मानाने गौरवण्यात आले. ‘अग्निपंख’ हे डॉ. अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र ‘राजहंस’ने प्रकाशित केले आहे. त्यातील ‘चिंतन’ या भागातील हा संपादित अंश.*

१९९०च्या प्रजासत्ताक दिनी आपल्या देशात क्षेपणास्त्र प्रकल्पाचे यश साजरे केले गेले. मला आणि डॉ. अरुणाचलम यांना ‘पद्मविभूषण’ या सन्मानाने गौरवण्यात आले. श्री. जे. सी. भट्टाचार्य आणि आर. एन. अग्रवाल या माझ्या दोन सहकाऱ्यांना ‘पद्मश्री’ दिली गेली. देशाच्या इतिहासात शास्त्रीय क्षेत्रातील एकाच प्रकल्पातील संबंधित लोकांपैकी इतक्या जणांची नावे सन्मानयादीत समाविष्ट व्हायची ही पहिलीच वेळ होती. दहा वर्षांपूर्वी ‘पद्मभूषण’ सन्मान मिळाला होता, त्या वेळच्या आठवणींनी मला घेरून टाकले. मी त्या वेळी होतो, तोच होतो; तसाच राहत होतो. दहा बाय बाराच्या खोलीत पुस्तकांनी भरलेल्या कपाटांच्या संगतीने. त्या खोलीत कागद आणि अत्यावश्यक जुजबी भाड्याचे फर्निचर माझ्यासोबत तिथे होते. त्या वेळी ही खोली त्रिवेंद्रमला होती, आता हैदराबादला – इतकाच फरक होता. सकाळी मेसचा पोऱ्या इडली आणि ताक असा नाश्ता घेऊन आला. अभिनंदनाचे छानसे बुजरे हास्य मला देऊन गेला. माझ्या देशवासीयांनी माझ्या कामाच्या स्वीकृतीची पावती म्हणून दिलेल्या सन्मानाने मी भारावून गेलो. आपल्या देशातील संशोधक फार मोठ्या संख्येने पहिली संधी पकडून परदेशी जातात, भरपूर पैसा मिळवतात, ऐशआराम खरीदतात. पण मला माझ्या देशवासीयांकडून मिळणारे प्रेम, आदर आणि सन्मान यांची भरपाई कशाने होईल का?

पंधरा दिवसांनी अय्यर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आम्हाला मिळालेले सन्मान ‘नाग’च्या पहिल्या उड्डाणाने साजरे केले. लगेच दुसऱ्या दिवशी पुन्हा ‘नाग’

यशस्वीरीत्या उडवण्यात आले. पहिली संपूर्ण भारतीय बनावटीची मिश्र आकाशयान आणि इंधनव्यवस्था त्या दोन उड्डाणांनी परीक्षली गेली. इथेच बनलेल्या उष्णतेच्या गुणधर्मावर आधारित 'बॅटरी'सुद्धा कसोटीला उतरल्या.

पाश्चात्त्य देशांच्या तोडीने तिसऱ्या पिढीच्या रणगाडाविरोधी क्षेपणास्त्राचे तंत्रज्ञान भारताजवळ आता होते. फक्त वेध घेऊन उडवले की रणगाडा जमीनदोस्त व्हायला हवा, अशी ही शस्त्रे होती. मिश्र तंत्रज्ञान, स्थानिक कौशल्य यशस्वी करणाऱ्या या दोन महत्त्वाच्या पायऱ्या होत्या.

'नाग'मध्ये दोन नवीन तांत्रिक बाबी होत्या. इन्फ्रा–रेड आणि मिलिमेट्रिक लहरी वापरून रडारयंत्र तयार केले होते. जणू 'नाग'ला दृष्टी मिळाली होती. देशातील एकाही प्रयोगशाळेत ही अत्याधुनिक यंत्रे बनवायची क्षमता नव्हती, पण करून दाखवायची जिद्द जरूर होती. मग प्रकल्पाचे भाग पाहून एकेका ठिकाणी विकसन करण्यासाठी योजना बनवण्यात आली. चंदीगडच्या सेमिकंडक्टर कॉम्प्लेक्स येथे अनेक अँटेना वापरून अचूक संदेश ग्रहण करणारे 'चार्ज कपल्ड डिव्हाइस' बनवण्यात आले. 'सॉलिड फिजिक्स लॅब', नवी दिल्ली येथे त्या रडारसाठी योग्य असे पारा अन् कॅडमियम धातूंचे मिश्रण वापरून विद्युतभार ओळखणारे 'डिटेक्टर्स' विकसित करण्यात आले. 'डिफेन्स सायन्स सेंटर', दिल्लीमध्ये ज्यूल थॉम्पसन परिणामावर आधारित शीतकरण यंत्रणा बनली. (विशिष्ट धातूंच्या 'जोडा'मधून विद्युतशक्ती वाहताना दिशेनुसार त्यांचे तापमान कमी किंवा जास्त होते, त्या परिणामाला 'ज्यूल थॉम्पसन परिणाम' म्हणतात.) डेहराडून येथील डिफेन्स इलेक्ट्रॉनिक्स ॲप्लिकेशन लॅबोरेटरीमध्ये संदेश देणारे अन् घेणारे विशिष्ट 'ट्रान्समीटर' बनवण्यात आले.

त्याच महिन्यात मी मदुराईच्या कामराज विद्यापीठात पदवीदान समारंभाचे




ले. जनरल एसपीपी थोरात, ॲडमिरल भास्करराव सोमण,
फील्डमार्शल सॅम माणेकशा, ले. जनरल प्रेम भगत,
ले. जनरल सगतसिंग आणि ले. जनरल पंकज जोशी.
भारतीय सैन्यदलातील पराक्रमाची सहा उत्तुंग शिखरे!
त्यांच्या अमर कर्तृत्वाच्या या स्फूर्तिदायक कहाण्या...

दुर्दम्य
भारतीय सैन्यनेतृत्वाची उत्तुंग शिखरे

मेजर जनरल शशिकांत पित्रे (निवृत्त)

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

व्याख्यान देण्यासाठी गेलो. मदुराईला पोचल्याबरोबर मी माझ्या माध्यामिक शाळेच्या मास्तरांची — श्री. इयादुराई सालोमन यांची चौकशी केली. ८० वर्षांचे मास्तर आता रेव्हरंड झाले होते. मदुराईच्या एका उपनगरात राहत आहेत, असे कळल्यावर टॅक्सी घेऊन मी त्यांचे घर शोधले. आज विद्यापीठात माझे भाषण आहे, हे त्यांना ठाऊक होते; पण तिथे येणे त्यांना शक्य होणार नव्हते. गुरुशिष्यांची अपूर्व भावपूर्ण अशी भेट घडली. तामिळनाडूचे गव्हर्नर डॉ. पी. सी. अलेक्झांडर त्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. वृद्धत्वातही आपल्या जुन्या आवडत्या विद्यार्थ्याला न विसरलेले गुरू पाहून तेही हेलावून गेले. त्यांनी मास्तरांना व्यासपीठावर मानाने बसवून घेतले.

प्रत्येक विद्यापीठाचा प्रत्येक पदवीदान समारंभ म्हणजे प्रचंड ऊर्जेच्या लोंढ्याला वाट करून देणारी उघडी कवाडे असतात. मग संस्थांमधून, छोट्यामोठ्या व्यवस्थांमधून, उद्योगामधून त्या ऊर्जेला योग्य कामाला लावले जाते, खतपाणी घातले जाते अन् मग ती देशबांधणीला मदत करते. मी तिथल्या तरुण पदवीधारकांना माझ्या भाषणातून हे सांगितले. मला वाटले, की रेव्हरंड सालोमन यांचे २५ वर्षांपूर्वी उच्चारलेले शब्द प्रतिध्वनित होऊन माझ्या मुखातून बाहेर पडत आहेत. माझ्या भाषणानंतर मी माझ्या मास्तरांच्या पायाला हात लावून वंदन केले. ''मोठ्या माणसांची मोठी स्वप्ने अशी वारसा घेऊन कालौघावर वाहत पुढे जातात.'' माझ्या या बोलण्यावर ते उत्तरले, ''कलाम, तू माझी ध्येये फक्त गाठलीच नाही आहेस; तर तू त्याहून मोठा होऊन ती झाकोळून टाकली आहेस.'' भावनातिरेकाने त्यांचा वृद्ध आवाज रुद्ध झाला होता.

देशाचा चव्वेचाळिसावा स्वातंत्र्यदिन 'आकाश'च्या चाचणी उड्डाणाने साजरा केला. प्रल्हाद आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नवी घनरूप इंधने वापरून झटक्यात क्षेपणास्त्र पुढे न्यायचे 'बूस्टर रॉकेट' त्यामध्ये वापरले होते. त्यासाठी दुप्पट बैठक असलेले प्रॉपेलंट यंत्र वापरावे लागले. या पद्धतीचे बूस्टर इंजिन वापरून दीर्घ पल्ल्याची जमिनीवरून हवेत झेपावणारी क्षेपणास्त्रे भविष्यात बनवणे सहज शक्य झाले असते. जमिनीवरून केल्या जाणाऱ्या युद्धशास्त्रात देशाने 'आकाश'मुळे एक महत्त्वाचा टप्पा गाठला होता.



आ. २९वी । किंमत : ₹ २४०/- । (ट.ख.₹ ५०)

देशाच्या मिसाइल कौन्सिलने १९९१ हे वर्ष डी. आर. डी. एल. व आर. सी. आय.साठी नव्या संकल्पनांचे वर्ष असे जाहीर केले. आम्ही जेव्हा समग्र

क्षेपणास्त्र प्रकल्पाची सुरुवात केली, तेव्हा ती वाट काट्याकुट्यांनी भरलेली होती. एकदा 'पृथ्वी' अन् 'त्रिशूळ' बनल्यावर पुढील रस्ता तुलनेने सोपा होता. माझ्या सहकाऱ्यांना मी प्रत्यक्ष उपयोगात येऊ शकतील, अशा पद्धतीने चाचण्या घ्यायला सांगितल्या. हे तसे कठीण होते; पण आम्ही आता कशाची भीती बाळगत नव्हतो.

१९९१ची सुरुवात अनिष्टसूचक घटनांनी झाली. १५ जानेवारी १९९१ला आखाती युद्धाला सुरुवात झाली. इराक आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखालील दोस्त राष्ट्रे यांच्यामध्ये युद्धाला तोंड फुटले. उपग्रहांमुळे युद्धाच्या सर्व बातम्या भारतीय उपखंडात सचित्र दिसत होत्या. प्रत्यक्ष युद्धभूमीवरची दृश्ये दिवाणखान्यातील दूरदर्शनच्या पडद्यावर दिसू लागली. रॉकेट आणि क्षेपणास्त्रे यांनी देशवासीयांना गुंगवून टाकले. 'स्कड' आणि 'पॅट्रिऑट' याबद्दलच्या चर्चा चहाकॉफीच्या दुकानांपासून सर्व ठिकाणी होऊ लागल्या. मुलांच्या पतंगांची नावे आणि आकारही क्षेपणास्त्रांसारखे झाले. अमेरिकेच्या दूरदर्शन केंद्रावरून प्रक्षेपित केले जाणारे शब्द मुलामाणसांच्या तोंडात सहज बसून गेले. त्याच वेळेला 'पृथ्वी' अन् 'त्रिशूळ'ची उड्डाणे करण्यात आली; त्यामुळे युद्धाच्या भीतीची छाया भारतीय समाजमनावरून पुसली गेली. आपण संरक्षणदृष्ट्या कुठेही मागे नाही आहोत, ही भावना आश्वस्त करणारी होती. वर्तमानपत्रांनी क्षेपणास्त्राच्या अनेक बारीक तपशिलांवर मोठाले अहवाल लेखस्वरूपात लिहिले. पृथ्वी आणि त्रिशूळच्या मार्गदर्शन यंत्रणा, लघुलहरी वापरून केलेले संदेशवहन अशा गोष्टींनी सामान्यजनांमध्ये जागृती झाली. आखाती युद्धात वापरली गेलेली क्षेपणास्त्रे आणि आमच्या चाचण्या यांमधील साम्य जनतेच्या चटकन लक्षात आले. तंत्रज्ञानदृष्ट्या आपणही तेवढेच सक्षम आहोत, हे कळून चुकले. त्या काळात मला नेहमी विचारले जात असे, "पृथ्वी हे स्कडपेक्षा उजवे आहे का? आकाश,

अभिनंदन!
नरेंद्र विद्यापीठ संस्था, कोल्हापूर

उत्कृष्ट काव्यसंग्रह
पुरस्कार
**आतून उगवलेल्या कविता**
◆
प्रा. प्र. द. कुलकर्णी


पॅट्रिऑटइतके प्रभावी आहे का?''

माझ्या ''हो'' अथवा ''का नाही?'' या उत्तरावर लोकांचे चेहरे अभिमानाने, समाधानाने उजळून उठत असत.

तंत्रज्ञानदृष्ट्या दोस्त राष्ट्रांचे पारडे जड होते. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावरती ऐंशीव्या अन् नव्वदाव्या दशकातील विकसित केलेली शस्त्रे ते वापरत होते; तर इराकचे बहुतेक युद्धसाहित्य साठ, सत्तर दशकांतल्या तंत्रज्ञानावर आधारित होते.

इथे आधुनिक जगातील सत्तेच्या वर्चस्वाची उतरंड हा कळीचा मुद्दा बनतो. तंत्रज्ञानाचे श्रेष्ठत्व, आधुनिकता वर्चस्व गाजवते. शत्रूला अत्याधुनिक तंत्रज्ञानापासून वंचित ठेवायचे, अन् मग आपल्या अटी एकतर्फी लादायच्या. दोन हजार वर्षांपूर्वी चिनी तत्त्वज्ञानी 'सून त्झू' याने युद्धशास्त्राचा एक महत्त्वाचा नियम सांगितला आहे. युद्धामध्ये शत्रूच्या मानवी शक्तीचे खच्चीकरण करण्यापेक्षा शत्रुसैन्याचे मनोधैर्य खच्ची करणे जयासाठी अधिक महत्त्वाचे आहे. मनाने हरलेले सैन्य सहज पराभूत होऊ शकते. हे सांगताना त्याने जणू विसाव्या शतकातील तंत्रज्ञानाच्या वर्चस्वाला डोळ्यांसमोर ठेवले असावे. आखाती युद्धात वापरली गेलेली इलेक्ट्रॉनिक शस्त्रे अन् क्षेपणास्त्रे यांचा एकत्रितपणे केला गेलेला मुबलक वापर पाहणे हे युद्धशास्त्राच्या माहितगारांना डोळ्यांना मेजवानी मिळाल्यासारखे होते. जणू एकविसाव्या शतकात युद्ध झाले, तर जगाच्या रंगमंचावर काय दिसेल याची झलक पाहायला मिळाली. क्षेपणास्त्रे, इलेक्ट्रॉनिक शस्त्रे, माहिती-तंत्रज्ञान हे जणू त्यावर प्रमुख भूमिका निभावणार आहेत.

आपल्या देशात 'तंत्रज्ञान' म्हणजे अजूनही काळा धूर ओकणाऱ्या उंच चिमण्या आणि कर्कश आवाज करणारी अवजड यंत्रे हेच चित्र बहुसंख्य लोकांच्या डोळ्यांसमोर उभे राहते. हे विपर्यस्त चित्र आहे. मध्ययुगामध्ये घोड्याचा लगाम शोधला गेला अन्

अभिनंदन!

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे



विज्ञानविषयक लेखनासाठी
गो. रा. परांजपे पुरस्कार

डॉ. सुनील विभुते

शेतीशास्त्रात आमूलाग्र बदल झाला. त्यानंतर कित्येक शतकांनी बेसामरची धातू वितळवणारी भट्टी बनली अन् मानवाने धातूला हवा तो आकार देऊन फार मोठी तांत्रिक झेप घेतली. तंत्रज्ञानामध्ये अशी काही संशोधने किंवा यंत्रे बनतात की त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग होतोच असे नाही; पण ज्ञान म्हणून ते मानवाला समृद्ध करत राहते. उदाहरण द्यायचे झाले, तर रसायनशास्त्रातील प्रक्रिया, मासे प्रजनन करतात ते शास्त्र, गवत उपटण्याचे, रोगी तपासायचे, वा इतिहास शिकवायचे, युद्धे करायचे वा थांबवायचे अशी अनेक देता येतील.

आज अधिकांश तंत्रज्ञान हे फिरत्या पट्ट्यापासून वा उघड्या भट्टीपासून दूर असते. इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश संशोधन अशा नव्या क्षेत्रांत तर शांतता आणि स्वच्छता प्रथम क्रमांकाची गरज असते. फिरत्या पट्ट्यापाशी उभी असलेली लहानसहान कामे करणारी माणसांची फौज हे चित्र कालबाह्य झाले आहे. नव्या तंत्रज्ञानाला सोबत नेण्याआधी जनमानसातली ही तंत्रज्ञानाची कालबाह्य प्रतीके आधी बदलायला हवीत. तंत्रज्ञान हे तंत्रज्ञान पचवूनच वाढते, अधिक पुढे जाते; स्वत:चा उद्धार स्वत:च करू शकते. एका अर्थाने तंत्रज्ञानातील प्रगती ही तीन टप्प्यांमध्ये एकमेकांत गुंतलेली वर्तुळाकार साखळी असते.

पहिली निर्मिती अवस्था, ज्यामध्ये एखाद्या कल्पनेचा आराखडा असतो. मग तो आराखडा सत्यात उतरवला जातो आणि प्रत्यक्ष व्यवहारात त्याचा वापर केला जातो. मग ते समाजात मिळून मिसळून जाते अन् जीवनाचा एक भाग बनते. इथे हे वर्तुळ पूर्ण होते. असे हे तंत्रज्ञान समाजात मुरले, की त्याची सवय होते आणि अधिक परिपूर्णतेकडे जाण्यासाठी नव्या कल्पना सुचतात. असे हे एकातून उद्भवणारे दुसरे वर्तुळ आहे. विकसित देशात या वर्तुळातील प्रत्येक टप्प्यातील वेळेचे अंतर कमी कमी होते आहे. आपल्या देशात आपण नुकते वर्तुळ पूर्ण व्हायच्या पायरीवर





जागतिक दर्जाचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर
यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उमटलेल्या
मूळ हिंदी पुस्तकाचा सुबोध,
रसाळ मराठी अनुवाद.

ताऱ्यांची जीवनगाथा

डॉ. जयंत नारळीकर
अनुवाद : पुष्पा खरे

किंमत : ₹ १४०/- । (ट.ख. ₹ ५०)

पोचलेलो आहोत.

आखाती युद्धात तंत्रज्ञानदृष्ट्या वरचढ असलेल्या दोस्त राष्ट्रांचा विजय झाला अन् आम्ही डी. आर. डी. एल. व आर. सी. आय. येथील ५०० संशोधकांनी एकत्र येऊन उद्भवलेल्या परिस्थितीची चर्चा करायची गरज उत्पन्न झाली. मी प्रश्न विचारला, ''प्रगत देशांच्या तोडीने शस्त्रे उत्पन्न करणे शक्य आहे का? आणि जर शक्य असेल तर ते आपण करावे का?'' या प्रश्नांवर चर्चा सुरू झाली आणि त्यातून अनेक गंभीर मुद्दे उद्भवले. इलेक्ट्रॉनिक्स युद्धशस्त्रांचा वापर वाढवावा, सुधारित क्षेपणास्त्रे बनवताना इलेक्ट्रॉनिक यंत्रे वापरली जावीत, कुठल्या क्षेत्रात संशोधन करावे म्हणजे प्रगती होईल, प्राथमिकतेचे निकष कोणते असावेत? अशा अनेक मुद्द्यांना स्पर्श करत तीन तास विचारमंथन झाले.

आपल्या प्रमुख शत्रूच्या विशिष्ट क्षेत्रात असलेल्या क्षमतेइतकी शस्त्रे आपल्याजवळ असली, तर पुरेसे आहे –असा एकूण चर्चेचा सूर होता. संशोधकांच्या गटांनी 'पृथ्वी'ची ५० मीटर क्षेत्रफळाची अचूकता वाढवून ते क्षेत्र (सी.ई.पी.) आणखी कमी करायचा निश्चय केला. त्रिशूळची मार्गदर्शन यंत्रणा आणखी विस्तृत अन् अचूक करायची, कार्बन-कार्बन मिश्रणांचे पृष्ठभाग, 'री–एंट्री' तंत्रज्ञानासाठी विशेषत्वाने विकसित करून 'अग्नी'साठी वापरायचे आणि वरील तिन्ही कार्ये वर्षअखेरीस पूर्णत्वाला न्यायची. केलेला निश्चय वर्षभरात अमलातही आणला गेला. 'नाग' क्षेपणास्त्राचे प्रक्षेपक वाहनातून अवतरण यशस्वी झाले तेही त्याच वर्षी. 'त्रिशूल'ची समुद्रसपाटीपासून सात मीटर उंच भरारी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. त्याचा वेग आवाजाच्या तीनपट होता (मॅक नंबर ३). आता स्वदेशी तंत्रज्ञान वापरून बोटीवरून उडवायच्या समुद्री क्षेपणास्त्राचे तंत्रज्ञान विकसित करणे शक्य होईल, असा विश्वास उत्पन्न झाला.

१५ ऑक्टोबर १९९१ला मला साठ वर्षे पूर्ण झाली. निवृत्त झाल्यावर मी


लहानथोरांच्या मनात एकाच वेळी कुतूहल अन् जिज्ञासा
निर्माण करणाऱ्या आणि त्याच वेळी त्यांना अचंबितही
करणाऱ्या या विश्वाचा सुबोध परिचय करून देण्यासाठी
सुप्रसिद्ध खगोलतज्ज्ञ गिरीश पिंपळे
यांनी रोखलेली दुर्बीण म्हणजे -

ओळख आपल्या विश्वाची

डॉ. गिरीश पिंपळे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



दुर्लक्षित वर्गातील गुणवान मुलांसाठी शाळा काढायची ठरवली होती. भारत सरकारच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाचे प्रमुख, माझे मित्र प्रोफेसर पी. रामाराव यांच्याशी भागीदारीत ही राव-कलाम शाळा सुरू होणार होती. काही धोरणे ठरवून ती अमलात आणणे, काही प्रकल्प आखून ते पूर्ण करणे, काही महत्त्वाचे टप्पे निर्माण करणे आणि ते गाठणे कितीही अर्थपूर्ण अन् महत्त्वाचे असले; तरी ती आयुष्याची इतिकर्तव्यता असू शकत नाही. समाजाला त्यांच्या पातळीवर उतरून काहीतरी देणे हेही महत्त्वाचे आहे, यावर आम्हा दोघांचे एकमत होते. पण आमची ही योजना आम्हाला पुढे ढकलावी लागली. भारत सरकारने आम्हा दोघांनाही निवृत्त करायचे नाकारले.

त्या काळात मी माझी निरीक्षणे, आठवणी आणि काही विषयांवरची माझी मते कागदावर व्यक्त करायची ठरवली.

माझ्या मते भारतीय तरुणांपुढची सर्वांत मोठी समस्या म्हणजे स्पष्ट दृष्टीचा अभाव, नक्की दिशेचा अभाव ही आहे. त्यामुळे माझ्या भोवतालची प्रतिकूल परिस्थिती, मला साहाय्यभूत ठरलेल्या व्यक्तींची माहिती यांची कल्पना द्यावी; असे मला वाटले. काही व्यक्तींचा सन्मान करणे, माझ्या आयुष्यात मिळवलेल्या गोष्टींची जंत्री देणे हा या पुस्तकाचा हेतू मुळीच नाही. तर मी हे सांगू इच्छितो, की कुणी माणूस कितीही छोटा असेल, गरीब असेल, अभावाच्या परिस्थितीत असेल; तरी त्याने हिंमत हरण्याची गरज नाही. समस्या ही जीवनाचा एक भाग आहे, दु:ख हे यशाचे सार आहे.

माझे आयुष्य दुसऱ्या कुणासाठी आदर्श आहे, असा माझा दावा नाही. पण कुणा गरीब मुलाला, कोपऱ्यातल्या गावी राहत असेल, अभाव असलेल्या समाजस्तरावर जीवन व्यतीत करत असेल; तर माझ्या आयुष्याला नियतीने दिलेला आकार पाहून दिलासा मिळेल. निराशेच्या, मागासपणाच्या खोट्या आभासमय कल्पनांच्या बंधनातून



डॉ. कलामांच्या विविध पैलूंवर
त्यांच्या निकटवर्तीयांनी आठवणींच्या रूपाने
टाकलेला हा प्रकाशझोत.

ए.पी.जे. अब्दुल कलाम :
एक व्यक्तिवेध

आर. रामनाथन ।
अनुवाद : माधुरी शानभाग

आवृत्ती आठवी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

मुक्त व्हायला मदत होईल. आता तशी मुले कुठे आहेत मला ठाऊक नाही; पण देव सदैव त्यांच्याबरोबर आहे आणि देव जेव्हा त्यांच्यासोबत आहे, तेव्हा त्यांच्या विरुद्ध कोण असू शकेल!

माझे एक निरीक्षण आहे – बहुसंख्य भारतीयांना आयुष्यभर विनाकारण दु:ख सहन करत राहायची वेळ येते; कारण त्यांना आपल्या भावनांना काबूत ठेवता येत नाही. कुठल्यातरी अज्ञात मानसिक जडत्वाची ते शिकार असतात. 'हे एकच उत्तर आहे, जेव्हा परिस्थिती सुधारेल तेव्हा, त्यातल्या त्यात उत्तम मार्ग' असे शब्द व्यवसायात, उद्योगधंद्यांत आपल्या कानावर नेहमी येत राहतात. नकारात्मक, भीतीच्या भावना आपल्या हृदयात अशा काही खोल पुरलेल्या असतात की, आपल्या विचारांची पद्धत नकारार्थी उत्तरांकडे जाते. मी त्या भीती दूर व्हाव्यात म्हणून कागदावर पेन टेकवले आहे. मी अनेक संस्थांमध्ये, अनेक लोकांबरोबर काम केले आहे. त्यातील काही जणांनी स्वत:च्या मर्यादा स्वत:च निश्चित केलेल्या होत्या. स्वत:ला सिद्ध करण्यासाठी त्यांनी मला अनेक वेळा वापरले, वाकवले. भारतीय विज्ञानक्षेत्रात असलेल्या काही व्यक्तिसंहारक सापळ्यांची अन् त्यामुळे उद्‌भवणाऱ्या शोकांतिकांची कल्पना यावी, हा एक उद्देश या आठवणी सांगण्यामागे आहे; तसेच सहकाराने, संख्यात्मक पातळीवर, एकत्रित प्रयत्नांनी मिळवलेल्या यशाबद्दलच्या कहाण्याही यामध्ये आहेत.

माझी अशी इच्छा आहे, प्रत्येक भारतीयाच्या अंतरात वसत असलेल्या अग्निबिंदूला पंख लाभावेत आणि या महान देशाचे भवितव्य उजळून निघावे, त्याने आकाशाला पालाण घालावे!

❖

ज्ञानाची क्षितिजे, नीतिमत्तेच्या चौकटी,
वैद्यकसत्ता अन् मानवी प्रवृत्ती
या साऱ्यांचा वेध घेणारी
अमर्त्य पेशींची खरीखुरी कहाणी...

'हेला'पेशी
कहाणी अमर्त्य पेशीची

वंदना अत्रे । शोभना भिडे

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)



**विज्ञानाबद्दल कुतूहल असणाऱ्या, तसेच रहस्य आणि गूढतेविषयी आकर्षण असणाऱ्या रसिक वाचकांसाठी तीन नव्या कादंबऱ्या...**




नव्याने रुजू झालेला तरुण, तडफदार इन्स्पेक्टर धनेश...
गावातील प्राचीन शिवमंदिर नि त्याविषयीच्या आख्यायिका...
एकामागोमाग एक घडणाऱ्या रहस्यमय घटना...
धनेश त्याच्या गुप्त 'मिशन'मध्ये यशस्वी होणार का?

## द सीक्रेट मिशन

राधिका कुलकर्णी

किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)

१६९५मध्ये औरंगजेबाच्या एका जहाजावर पडलेल्या दरोड्याचा शोध घेण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग केला जातो. ही सांगड घालताना निर्माण होणारे प्रश्न आणि निघणारे निष्कर्ष खरे असतील का? किंवा खरेच निघाले तर...?

## १६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!

सुरेश वांदिले

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)







पंचक्रोशीतला वतनदारांचा वाडा. वैभवशाली, सालंकृत लक्ष्मीसारखा देखणा... वाड्यात अधूनमधून दिसणारा मूळपुरुष नाग... आणि घरातल्या कर्त्या, सवाष्ण स्त्रियांना अल्पायुष्याचा शाप... काळाच्या कुपीत दडलेली रहस्यं उलगडत जाणारी कादंबरी.

## सवाष्ण

डॉ. क्षमा गोवर्धने शेलार

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)



# चित्र पाहीन आवडी

## सर्जन आणि
## विसर्जनाचा खेळ

भारतीय समाजाने विसर्जनाला अनेको वर्षे आपलेसे केलेले आहे. मनुष्यदेह आणि जोडीने येणारा एकूण परिसर आपले जगणे अर्थपूर्ण करतो. काही द्रष्टे लोक, विचारवंत परिसर-निरीक्षणातून काही विचार मांडतात आणि त्यातूनच अनेक कल्पना जीवनाच्या रूढी-परंपरा यांचा भाग बनतात. बहुधा अशाच प्रक्रियेतून विसर्जनाची संकल्पना जनमानसात सर्वत्र रुजत गेली असावी. 'विसर्जनाशिवाय सर्जन नाही' असे एक वाक्य परवा मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या बोलण्यातून समाजमाध्यमांवर ऐकले आणि ह्याबाबतची दृश्यकलेतील अनेक उदाहरणे डोळ्यांपुढे तरळली. हाच संदर्भ घेऊन चित्र पाहण्याच्या आपल्या प्रयासात एक नवा संदर्भ किंवा पैलू पाहूयात.

अगदी मराठी समाजात; किंबहुना बंगाली, तमिळ, कानडी सर्वच प्रदेशांत काहीना काही रूपात मातीच्या वस्तू धार्मिक कामांसाठी तयार करायच्या अशी प्रथा आहे. आदिवासी समाजातही अशा परंपरा दिसून येतात. ह्या वस्तू किंवा शिल्पे कच्च्या मातीच्या किंवा लाकडाच्या स्वरूपातील असून सर्वसाधारणपणे त्या नाशवंत असल्याकारणाने साहजिकच त्यांच्यासाठी 'पार्थिव' असा शब्द वापरात आहे. जसे की पार्थिव गणपती, मातीचे गोकुळ-नाग किंवा बंगालमधील दुर्गा-कालीमाता वगैरे अनेक उदाहरणे दिसायला लागतात. ह्या देवता तयार करायच्या आणि मग त्यांचे पाण्यात विसर्जन करायचे. आता ह्या देवता कला-शिल्पे म्हणून पाहिल्या की त्यांचे संदर्भ बदलतात. म्हणजे एका अर्थाने 'सर्जन आणि विसर्जन' हा संदर्भ आपण दृश्य कलेसंदर्भात मान्य केलेला आहेच.

### आधुनिक कलेतील 'सर्जन आणि विसर्जन'

एकुणात १९६०च्या दशकात अमेरिकेच्या उत्तर भागात लँड आर्ट, पर्यावरणपूरक कला, भूमिकला अशा अनेक नावांनी ओळखली जाणारी कला उदयास आली. तिचे स्वरूप आज जगभर सर्वत्र पसरलेले दिसते.

याची सुरुवात संकल्पनात्मक आणि साधारणीकरण ह्या कलाविचारांतून पुढे आली. जगात ह्या काळात पर्यावरणविषयक जागृती आणि विचार पुढे आला व त्याचा



प्रत्यक्ष परिणाम दृश्यकलेवर झाला.

कलेने नवे स्वरूप घेतले, कलादालनाच्या चार भिंतींच्या बाहेर कला आली आणि खरेदी-विक्री यांच्यापलीकडे कला मोकळेपणाकडे जाताना दिसते. जर्मन चित्रकार जोसेफ बेउस याने जे विचार मांडले, ते पुढे महत्त्वाचे ठरले. तो म्हणत असे की, 'कोणीही सर्जनशील असू शकतो आणि कोणत्याही वातावरणात कलानिर्मिती करू शकतो.'

आपल्याकडे जसे निसर्गातून माती घ्यायची, मातीचीच मूर्ती करायची आणि पाण्यात विसर्जित केल्यावर ती परत मातीत जाते; तसाच विचार तिथेही दिसतो. निसर्गातील वस्तू घेऊन, तिथेच मांडून, कदाचित संपवून, ते विसरून किंवा साठवून तशीच निसर्गात ठेवून परतणे ही पद्धत कलावंत लोकांनी अवलंबली. कोकणातील आता प्रसिद्धीला आलेली आणि नव्याने नावारूपाला येत असलेली कातळशिल्पे याचेच प्राचीन उदाहरण होय. युरोपातील 'स्टोनहेन्ज' उपासना वर्तुळ असेच आकाशाच्या विस्तृत प्रांगणात, निसर्गात वसवले गेले आहे. असेच काही प्रयोग लँडआर्टमध्ये होतात असे दिसते. जोसेफ याचे 'जेट्टी' हे समुद्रातील शिल्प या कलाप्रवाहाचे उत्तम उदाहरण आहे. जिलबीच्या आकारात समुद्रात जाणारा मोठा थोरला बंधारा असे त्याचे स्वरूप आहे. परंतु हे कलेबाबत मोठे विधान आहे, असेदेखील म्हणावे लागेल. कारण ही कलाकृती कोणीही संग्रहात ठेवू शकणार नाही. ह्या कलेला 'अशक्य' (Impossible art) असेही म्हणता येईल. म्हणजे साठवणे शक्य नाही, अशी कला.



ब्रिटिश कलावंत अँडी गोल्ड्सवर्दी हा यातील एक आघाडीचा कलावंत. निसर्गात जाऊन तेथील घटक जाणीवपूर्वक निवडून, त्यांची सौंदर्यात्मक विभागणी करून मग रचना करणे आणि तिथेच ते सोडून येणे, ही त्याच्या कलाव्यवहाराची कृती होय. इथे कला घडताना पाहणे - प्रक्रिया पाहणे, हा आनंदाचा भाग. जसे की तो निसर्गात जातो आणि विविधरंगी पाने जमवतो. त्याचे गडदपासून फिके रंग असे विभाजन करतो आणि तसे एकमेकांना जोडून पत्रावळीसारखी पण लांबलचक अशी ही 'पत्रमाला' तयार करून तो पाण्याच्या प्रवाहात सोडतो. त्यामुळे एक प्रकारची तरलता, स्वच्छता, असे सौंदर्यभान असलेले वातावरण अनुभवता येते, तेही निसर्गाच्या लयीसोबतीने.

गोल्ड्सवर्दी आपल्याकडच्या गलोरी खेळासारखे दगडावर दगड - मोठे चपटे दगड खाली आणि वर लहान-लहान होत जाणारे - नदीकाठी मांडतो. भरती आली की ते सगळे मनोरे जलमय होतात. यावर गोल्ड्सवर्दीची असलेली फिल्म 'River and Tides' आपण नक्कीच पाहू शकतो.

निसर्गात काड्या गोळा करून घरट्यासारखी, पण भव्य मांडणी-रचना करताना तो दिसतो. त्याच्या कलाप्रक्रियेवरील अनेक फिल्म समाजमाध्यमांवर सहज उपलब्ध आहेत. कलाकृतींमधून क्षणभंगुरतादेखील अनुभवता येते. या फिल्मद्वारे पाहूयात कलेतील 'सर्जन आणि विसर्जनाचा खेळ'.

***नितीन हडप,*** ९३७२४१८६१५

## 'राजहंसी' विविधा




सोनाली कुलकर्णी एक गुणी अभिनेत्री. सोनाली माणसांना वाचते आणि शब्दांतून त्यांची व्यक्तिचित्रं रेखाटते. अशा संवेदनशील, संवादोत्सुक अभिनेत्रीला पाहण्या-ऐकण्याएवढंच 'वाचणं'ही किती लोभस असू शकतं, याचं उदाहरण म्हणजे...

### सो कुल.. टेक २

सोनाली कुलकर्णी

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

आधुनिक तंत्रांचं विविध निकषांवर कठोर परीक्षण करून त्यांची घातकता दाखवून देणारं हे पुस्तक : 'समुचित' तंत्रांच्या संयमित वापराकडे जाण्याची आवश्यकता प्रतिपादन करणारं...

### तंत्र-मुक्ती

दिलीप कुलकर्णी

किंमत : ₹ ४२५/- । (ट.ख. ₹ ५०)







ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची. ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी अपघातानं ती एक चूक करते. पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं. यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडतो का? परतीची वाट सापडते का?

### डोईचा पदर आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)



# असे जन्मले पुस्तक!

## पाषाणाचे पाझर

मथळ्याच्या मुख्य भागाकडे येण्याअगोदर दोन-तीन गोष्टींचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे. खरं तर माझा पिंड लेखकाचा नाही. पण मी गोष्टीवेल्हाळ असल्याची ग्वाही माझे आप्तेष्ट व स्नेही मंडळींनी वरचेवर दिलेली आहे. वाचनाचे वेड वंशपरंपरागतच असल्याने मी सर्व प्रकारचे साहित्य - मराठी, इंग्रजी व काही प्रमाणात हिंदीही - शालेय जीवनापासून अगदी आतापर्यंत वाचण्याचे 'ते' वेड जोपासले आहे.

तरीदेखील आपल्या हातून कधी काळी एखादी साहित्यनिर्मिती होईल, असे स्वप्नातही वाटले नव्हते. अखेर लेखनास प्रवृत्त होण्यास तीन अगदी वेगवेगळी कारणे मागे बघताना सांगता येतील.

स्वतंत्र भारतातील पहिल्या पिढीचे आम्ही प्रतिनिधित्व करतो, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. दुसरे महायुद्ध व स्वातंत्र्यानंतरची पंधरा-सोळा वर्षे सोडल्यास नंतरच्या काळात अतिप्रचंड वेगाने घडलेल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, भौगोलिक, धार्मिक, शैक्षणिक, शास्त्रीय स्थित्यंतरांचे आम्ही साक्षीदार आहोत.

एकत्र कुटुंबपद्धती उतरणीस लागली, व्यवसाय व नोकरी यांच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात लोकांनी स्थलांतरे केली. माझ्या लहानपणातील उन्हाळी सुटीतील आजोळची कौटुंबिक संमेलने हळूहळू विरळा होत गेली. लग्न-मुंजी, दिवाळी, दसरा व इतर सणवारांच्या निमित्ताने होणाऱ्या नातेवाइकांच्या गाठीभेटी दुर्मीळ होऊ लागल्या. आजोबा-आजी यांच्याबरोबर बालगोपालांचे गोष्टीरूपाने होणारे विविध विषयांवरील आदानप्रदान लोप पावत गेले. या सर्वांचा परिणाम म्हणून नातेसंबंध दुरावले. माझी पिढी त्यामानाने बरीच सुदैवी. आम्ही यातील बरेच फायदे अनुभवले. आता येणाऱ्या पिढीस चुलत, मावस, आते व मामे नातेसंबंधाची जाणीव असेल हे सांगणे कठीणच आहे.




किंमत : ₹ ९५०/- । (ट. ख. ₹ ५०)

ह्याला तोडगा म्हणून, मी माझे वरिष्ठ आप्त-स्वकीय, बरोबरचे मित्र यांनी स्वत:च्या जीवनातील आठवणी, स्मृती ताज्या आहेत तोवर साहित्यिक मूल्यांची काळजी न करता गोष्टीरूपाने लिहून काढाव्यात असा आग्रह धरत असे.

या बाबतीतील माझा स्वत:चा अनुभव खूपच बोलका आहे. माझे आजोबा गणेश नारायण गाडगीळ (१८७० ते १९४२) यांनी अगदी रोजनिशी स्वरूपात 'माझी जीवनगंगा' नावाने त्यांच्या जीवनातील प्रमुख घटनांच्या ज्या नोंदी केलेल्या आहेत, त्यावरूनच त्या काळाची व जीवनमानाची पूर्ण ओळख होते.

त्याचप्रमाणे माझे वडील भास्कर गणेश गाडगीळ (१९१० ते १९९२) यांनी लिहिलेल्या आठवणी, नोंदी व अनुभव अशा तपशिलांनी भरलेली पुस्तके मला गेल्या शतकाचा पडदा उघडून देतात व त्यांत मनमुराद हिंडवून आणतात.

आमच्या शैक्षणिक जडणघडणीत आम्हाला शिकवलेला इत्थंभूत इतिहास आम्ही कोणतेही प्रश्न न विचारता आकलन करून घेतला, सनावळ्या पाठ केल्या व त्याच काळातील ब. मो. पुरंदरे यांच्या गोष्टीरूपी इतिहासाने मोहरून गेलो.

हळूहळू नंतरच्या काळात लिखित इतिहासावरून वाद सुरू झाले; तट पडले. राजकीय, जातीय व सामाजिक रंग चढले; समाजात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न झाले. दंगे झाले, मालमत्तेचे नुकसान झाले. ऐतिहासिक दस्तऐवज जाळावेत व इतिहास परत लिहावेत इथवर मजल गेली.

एक नक्की की, बहुतेक काळात इतिहास हे जेत्यांनी त्यांच्या सोयीनुसार व फायद्यासाठीच लिहिले. काय खरे व काय खोटे हे सांगणे कठीण, तरीदेखील हमरीतुमरीवर येऊन वाद घालणारे जणू काही स्वत:च त्या काळात हजर होते अशा आविर्भावात वाद घालायला मागेपुढे बघत नाहीत.

माझ्या वाचनात गोपाळ भटजींचे १८५७च्या प्रथम स्वातंत्र्ययुद्धाच्या काळातील 'माझा प्रवास' व १८१८मध्ये मराठी साम्राज्य खालसा झाल्यानंतर साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंह भोसले यांच्या वारसदारांसाठी त्यांच्या रंगो बापूजी गुप्ते नामक वकिलाने ब्रिटिश न्यायालये व संसद येथे धाव घेऊन दिलेला कायदेशीर लढा असलेला वृत्तान्त वाचून मी नुसताच प्रभावित झालो नाही; तर समाजातील सर्व थरांतील, सर्वसामान्य जनांनी आपल्या स्वत:च्या आठवणी जमेल त्या पद्धतीने लिहून ठेवाव्यात, यावर दृढ झालो. अशा असंख्य दस्तऐवजांतूनच पुढील पिढीतील इतिहास अभ्यासकांना व संशोधकांना जी माहिती मिळेल, ती त्या त्या काळातील सर्व परिस्थितींवर प्रकाश पाडू शकेल; ज्याला कोणतेही 'अवास्तव रंग' नसतील व माहिती पडताळून पाहण्यासदेखील मोठ्या प्रमाणात नमुने उपलब्ध असतील, ह्या माझ्या मतावर मी ठाम झालो.

माझ्या नातेवाईक मंडळींना व इतर मित्रमंडळींना लिहिण्यास उद्युक्त करण्याचे माझे जोरदार प्रयत्न सुरूच होते. अशाच एका प्रयत्नात असताना माझ्या एका मित्राने मला 'सगळ्यांना लिहिण्याचा आग्रह करतोस, तर तू स्वत:च का लिहीत नाहीस?' असा

प्रश्न टाकला. त्यामुळे खरे तर डोक्यातील विचारांनी गती व दिशा घेतली. कोणताही विशिष्ट वाचकवर्ग डोळ्यांसमोर नव्हता. वयोमानानुसार सर्वच वाचकांना काही विशेष भाग रोचक वाटेल व त्याप्रमाणे त्यांना प्रेरणा मिळतील, असे मला वाटते.

त्याच वेळी करोनाने उचल खाल्ली. घरात बंदिस्त होण्याची वेळ आली. आठवणी सांगण्यात मी पटाईत होतो, पण लिहिण्याचा प्रसंग पहिलाच. त्यामुळे फार विचार न करता व कोणताही आकृतिबंध डोळ्यांसमोर न धरता लिहिण्यास सुरुवात केली. बराच काळ व्यावसायिक लिखाण इंग्रजीत केले असले, तरी मराठीतच लिहिणार हे पक्के होते. 'एक आठवण, एक गोष्ट' असे कोष्टक मनात धरले. कालसंगतीत सुरुवातीला गुंतून न पडता जसे सुचले, तसे लिहिणे चालू ठेवले.

करोनाचा जोर कमी झाल्यावरही उत्साहाने लेखन चालू ठेवले. प्रथम वाचक सौ. उमा व इतर काही मित्रांनीही उत्साह वाढवण्यास मदतच केली.

बरेच लिखाण झाल्यावर मग हळूहळू गोष्टींना कालसंगतीत गुंफायला सुरुवात केली व हस्तलिखिताने रूप घ्यायला सुरुवात केली. पुस्तक प्रसिद्ध करावे, हा विचार मनात प्रबळ होत गेला. परंतु हस्तलिखितातून पुस्तकनिर्मिती कशी करावी, ह्याबाबत पूर्णपणे अनभिज्ञ होतो. परंतु जे करायचे ते उत्तमच व त्यात तडजोड करायची नाही, हे सर्वच बाबतींमधील मूलभूत तत्त्व असल्याने काय हवे हे डोक्यात पक्के होते. त्या दृष्टीने मग 'पूछ पूछके पंडित बनो' ह्या पद्धतीने शोध सुरू झाला.

त्याच वेळी योगायोगाने आमची मैत्रीण प्रतिमा दलाल हिची भेट झाली व एकातून दुसरी अशा ओळखी होत मी सुलभा तेरणीकरांच्या संपर्कात आलो. त्यांनी आढेवेढे न घेता हस्तलिखितावर जरूर ते संस्कार करण्याची जबाबदारी स्वीकारली.

त्यांच्यामुळेच पुढे डॉ. सदानंद बोरसे, श्री. दिलीप माजगावकर अशा ओळखी होत 'राजहंस' परिवारात प्रवेश झाला. बऱ्याच प्रतीक्षेनंतर मग माझे हस्तलिखित सुंदर व देखण्या पुस्तकरूपात जन्मले. पुस्तकाची प्रथम प्रत हातात पडली व मन हरखून गेले.


एक मध्यमवर्गीय मुलगा परिस्थितीशी झगडत शिकून बांधकाम व्यावसायिक होतो. खाजगीकरण, उदारीकरण अन् जागतिकीकरण यांच्यामुळे त्याच्या आयुष्यात होते उलथापालथ. एका संवेदनशील माणसाच्या आयुष्याची वेधक कहाणी.

अलवार मनाची हुरहुर

राजीव शास्त्री

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



सुलभा तेरणीकरांच्या मदतीने मग सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. भारत सासणे ह्यांच्या हस्ते एका देखण्या व नीटनेटक्या समारंभात १० फेब्रुवारी २०२४ रोजी पुस्तक प्रकाशित झाले. सौ. उमाने अगदी सुरुवातीच्या लिखाण तपासणीपासून प्रकाशनापर्यंत मोलाची साथ दिली होती. मला व सौ. उमाला कृतकृत्य झाल्यासारखे वाटले.

प्रकाशनाच्या दिवशीच विक्रीसाठी ठेवलेल्या सर्वच प्रती हातोहात खपल्या. दुसऱ्या दिवशीपासूनच वाचकांच्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया येऊ लागल्या. 'सुबक', 'देखणे', 'पुस्तकातील फोटो उत्कृष्ट', 'वाचायल्या लागल्यावर हातातून सोडवत नाही', 'वाचनीय शैली, उत्कृष्ट व्यक्तिचित्रण - व्यक्ती अगदी डोळ्यांसमोर उभी राहते' अशा सर्वांच्याच साचेबद्ध प्रतिक्रिया आल्या. सुरुवातीला मला वाटले की, या बहुधा आपल्या ओळखीतील वाचकांच्या असतील. पण चार-पाच दिवसांच्या आतच मला अगदी अनोळखी व्यक्तीचा परगावाहून फोन आला. त्यांनी पुस्तक विकत घेऊन दोन दिवसांत पुस्तक वाचून संपवले होते. ते पुस्तकाबद्दल भरभरून बोलले. पुस्तक वाचताना त्यांच्या जीवनातील अनेक आठवणी जागृत झाल्या व ते भावुक झाले होते. हा अनुभव मला अगदी नवा होता.

महत्त्वाचे म्हणजे विविध क्षेत्रांतील अनेक अनोळखी व ओळखीच्या व्यक्तींचे फोन अजूनही येत आहेत व प्रतिक्रियांमध्ये खूपच साम्य असते. परवाच कोल्हापूरहून शशिकांत कुलकर्णी नामक एका समवयस्क गृहशिल्पींचा फोन आला होता. तेही पुस्तकाच्या बाह्यरंगापासून अंतरंगातील बारीक-बारीक मुद्यांवर जवळपास अर्ध्या तासाहून जास्त वेळ भरभरून बोलले. त्यांनीही दोनएक दिवसांत पुस्तकाचा फडशा पाडला होता. त्यांच्या बोलण्यावरून पुस्तक अगदी बारकाईने वाचल्याचे कळत होते. त्यांच्या मित्रमंडळींमध्ये पुस्तकावर चर्चा करण्याचा मानसही त्यांनी बोलून दाखवला.

प्रत्येकाच्या जीवनाची विशिष्ट अशी कथा असतेच, यावर माझा ठाम विश्वास आहे. ती कथा जमेल तशी लिखित स्वरूपात लिहून काढावी. प्रत्येकाने ती पुस्तकरूपाने प्रकाशित करावीच, असाही माझा आग्रह नाही. अशा दस्तऐवजांचा त्यांच्या आप्तेष्टांना नक्कीच फायदा होईल व पुढील काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक इत्यादी संशोधकांनाही त्यांच्या संशोधनात नक्कीच फायदा होईल.



माझे पुस्तक वाचून तरुणांना त्यांच्या व्यावसायिक जीवनाला मार्गदर्शन मिळाले वा ते काही ध्येयाने प्रेरित झाले व काही वरिष्ठ मंडळींनी स्वत:ची गोष्ट लिहायला सुरुवात केली, तर माझ्या पुस्तकाचे चीज झाले असे मला वाटेल.

***विवेक गाडगीळ***



# आठवणींच्या खिडकीतून

## घर तिघांचं हवं

रत्नाकर मतकरी हे मराठीतले एक अग्रगण्य असे लेखक. सातत्यानं लिहीत असणं, हा त्यांचा श्वास होता. वाङ्मयाचे सारे प्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले. त्यांच्या नावावर ३९ नाटकं (२२ प्रौढांसाठी, १७ मुलांसाठी), १४ एकांकिका, २ लघुपट, ४ चित्रमालिका, १ चित्रपट, २० कथासंग्रह, ३ कादंबऱ्या, ९ ललितलेखमाला, ३ वैचारिक लेखसंग्रह, १ आत्मचरित्रात्मक, १ बालकथासंग्रह, १ बालगीतसंग्रह, १० कथासंग्रह, गूढकथासंग्रह असा प्रचंड साहित्यसंग्रह आहे. एखाद्याला 'हा माणूस आपले सर्व व्यापताप सांभाळून लिहितो तरी केव्हा' हा अचंबित करणारा प्रश्न पडतो. याचं कारण असं, की स्वत:ला खोलीत कोंडून घेऊन, टेबलावर कागदाचे गठ्ठेच्या गठ्ठे ठेवून सातत्यानं लिखाण करणारा हा लेखक नाही; तर नाटक, बालनाट्य, दूरदर्शन मालिका, लघुपट, चित्रपट अशा अनेक प्रकारच्या दृक्श्राव्य माध्यमांशी संबंध असलेला लेखक, दिग्दर्शक, निर्माता, कलाकार आणि नाट्यसंस्था यशस्वीपणे चालविणारा संस्थाचालकही आहे. या माध्यमांत विविध प्रकारच्या असंख्य माणसांशी प्रत्यक्ष संबंध येतो. नाटक असो, बालनाट्य असो किंवा एकांकिका असो; ती लेखकापासून ते रंगमंचावर सादर करण्यापर्यंत आणि तिचे विविध ठिकाणी यशस्वी प्रयोग करण्यासाठी काय काय हरतऱ्हेचे प्रयत्न करावे लागतात; हे 'जावे त्यांच्या गावा' तेव्हाच कळे. नाट्यकलेवर उत्कट प्रेम, जिद्द, साहस आणि सहनशीलता अशा अनेक गुणांचा संगम घडल्याखेरीज हे घडणं अशक्य! येरागबाळ्याचं हे कामच नोहे.

रत्नाकर मतकरींनी सर्व प्रकारची नाटकं लिहिली. विनोदी, गंभीर, समस्याप्रधान, सामाजिक आशयसंपन्न, बालनाट्यं - किती कितीतरी. त्यांचं 'घर तिघांचं हवं' हे नाटक मला माझ्या दृष्टीनं लिहायला, दिग्दर्शित करायला, रंगमंचावर प्रत्यक्ष सादर करायला आणि रसिकांच्या मनाचा ठाव घेण्यासाठी, प्रगल्भ विचारासाठी एक आव्हानात्मक कलाकृती आहे.

ताराबाई मोडक या बालशिक्षणक्षेत्रात क्रांती करणारी 'मादाम माँटेसरी पद्धत' आपल्याकडे उपयोगात आणण्याच्या प्रयत्नात होत्या. 'छडीपंतोजी' पद्धत दूर ठेवून मुलांना हसत-खेळत शिक्षण देणारी ही माँटेसरी शिक्षणपद्धती हा समाजाला चाळीसच्या दशकात एक धक्काच होता. त्यामुळे त्या काळी ताराबाईंना ठिकठिकाणी

विरोध सहन करावा लागला. आपल्या निष्ठावान सहकाऱ्यांच्या मदतीनं त्यांनी ‘शिशुविहार’ ही संस्था अत्यंत निष्ठेनं सांभाळली.

पण तरीही त्यांच्या व्यक्तिगत कौटुंबिक जीवनात पराकोटीचं दु:ख होतं. अत्यंत हुशार, कर्तबगार, यशस्वी, सधन वकील पण व्यसनं आणि इतर नाद यांमुळे आयुष्याची फरफट झालेला पती आणि मानसिक संतुलनाची शिकार झालेली मुलगी या फार मोठ्या बिकट समस्या होत्या. बालशिक्षणक्षेत्रातले यशस्वी प्रयोग आणि कौटुंबिक जीवनात दु:ख, अशा दुहेरी कसरती करत ताराबाई निर्धारानं आपलं काम करत होत्या.

ताराबाईंच्या जीवनावर नाटक लिहावं, ही कल्पना रत्नाकर मतकरींच्या मनात अनेक वर्षं रुजत होती. ताराबाईंविषयी मिळेल ते साहित्य ते वाचत होते. त्यात अधिक भर पडली ती श्रीमती पद्मजा फाटक यांनी लिहिलेल्या ‘शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक’ या चरित्रानं. त्यातून नाट्य कसं शोधून काढावं, या विचारानं मतकरी झपाटले होते. म्हणून त्यांनी पटकथा लिहिली. सर्व प्रसंग एकसंध उभे राहण्यासाठी दिवाळी अंकासाठी ‘दोघी’ नावाची कथा लिहिली. तिचं दूरदर्शन रूपांतरही केलं आणि अखेर पाच-सहा वर्षांच्या तपश्चर्येनंतर नाटक लिहिलं गेलं. ताराबाईंचं चरित्रनाट्य या सदरात मोडणारं हे नाटक नाही; म्हणून ताराबाईंच्या आत्मचरित्रामधल्या व्यक्तींची मूळ नावं न वापरता, त्याच आशयाची - प्रमिलाबाई, डी.एन., बेबी अशी पात्रांची नावं योजली.

नाटक लिहून झाल्यानंतर या क्षेत्रातल्या काही प्रमुख लोकांना मतकरींनी हे नाटक वाचून दाखवलं. त्यात कलाक्षेत्रातलं प्रयोगशील जोडपं म्हणजे अरविंद देशपांडे आणि सुलभा देशपांडे या दोघांनाही नाटक अतिशय आवडलं. त्यांनी नाटक रंगमंचावर आणण्याचं वचनही दिलं; पण दुर्दैवाची गोष्ट अशी, की दुसऱ्याच दिवशी अरविंद देशपांडे यांचं निधन झालं.



प्रत्येकाच्या मनात असते
हुरहुर लावणारी एक स्वप्नसृष्टी.
तिला साद घालणारी सिनेमाची एक सुंदर
दुनिया या पुस्तकात वस्तीला आलीय...

सुंदर ती दुसरी दुनिया

अंबरीश मिश्र

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

अखेर अनेक संकटांशी सामना करत रविवार, दिनांक २० जुलै १९९० रोजी सकाळी आणि दुपारी 'हाउसफुल्ल' होऊन 'घर तिघांचं हवं' हे नाटक रंगमंचावर अवतरलं; आणि रसिक, जाणत्या प्रेक्षकांनी नवीन नाटकाची अनुभूती अनुभवली.

पुण्यातील 'भरत नाट्य मंदिरा'त मी 'घर तिघांचं हवं' हे नाटक बघितलं आणि अक्षरश: भारावून गेलो. लेखन, दिग्दर्शन, अभिनय आणि नाटकाच्या सर्व तांत्रिक बाजू अत्यंत समाधानकारक असा तो प्रयोग होता. प्रमिलाबाई (रिमा), डी.एन. (दिलीप प्रभावळकर), बेबी (सुप्रिया), गोपाळ (मिलिंद फाटक), जिजी (वैजयंती चिटणीस), डॉक्टर (मोहन मुंगी) अशी पात्रयोजना होती. दिलीप प्रभावळकर यांनी या नाटकात अत्यंत वेगळ्या धाटणीची भूमिका करून आपण किती समर्थ अभिनेता आहोत याचा आदर्श वस्तुपाठच घालून दिलेला होता. रिमा प्रमिलाबाईंच्या भूमिकेत भावनांच्या विविध छटा अतिशय प्रभावीपणे व्यक्त करायच्या. त्यांचं दिसणं, वागणं, बोलणं हा उत्कृष्ट अभिनयाचा आदर्श. बेबीच्या भूमिकेत सुप्रिया मतकरी ही वय वर्षं १६ ते २६ हा कालखंड, वयात येणं, त्यातली तिची विमनस्कता आणि अखेर आपल्या जीवनाची आत्महत्या करून 'इतिश्री' करणं हे सारंच कुठेही तोल न सोडता उत्तम प्रकारे साकारायची. वैजयंती चिटणीस, मोहन मुंगी, मिलिंद फाटक आपापल्या भूमिका अत्यंत समरसतेनं आणि स्वाभाविकपणे करत. लेखक/दिग्दर्शक रत्नाकर मतकरी, प्रकाशयोजना राजन ताम्हाणे, कलादिग्दर्शक अजित दांडेकर आणि पार्श्वसंगीतात सैगलची गाणी, प्रमिलाबाईंचे शिक्षणविषयक विचार आणि त्यांनीच लिहिलेल्या 'ऊ ची टू' या बालगीताचा उपयोग अशा सर्व सामर्थ्यानिशी 'घर तिघांचं हवं'चा भरत नाट्य मंदिरात बघितलेला प्रयोग आजही तितकाच ताजा, टवटवीत आहे.

'घर तिघांचं हवं' हे नाटक एका वेगळ्याच प्रसंगानं माझ्या मनावर ओरखडा काढून गेलं आहे. त्याचं झालं असं, की 'घर तिघांचं हवं'चा रात्रीचा प्रयोग बालगंधर्व रंगमंदिरात होता. माझ्या एका मित्राला (नाव माहीत असून मुद्दामच सांगत नाही.)


बेर्डेंमधला लेखक - दिग्दर्शक - चित्रकार - नेपथ्यकार - पार्श्वसंगीतकार - जाहिरात कलाकार - वाद्यवृंदकार कसा घडत गेला, नावारूपाला आला याची ही प्रेरणादायक कहाणी. कोकणच्या अंत:स्पंदनांची रम्य स्मरणयात्रा.




हिरवी पोर्ट्रेट्स

पुरुषोत्तम बेर्डे

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

दिलीपला भेटायचं होतं. मी दिलीपचा मित्र म्हणून त्यानं मला त्याच्याबरोबर येण्याचा आग्रह केला. वास्तविक नाटक सुरू असताना कलाकारांना भेटणं, हे मला अजिबात आवडत नाही. प्रयोग सुव्यवस्थित होण्यासाठी कलाकारांना नाटक सुरू होण्यापूर्वी आणि नाटक सुरू असताना भेटणं, ही माझ्या दृष्टीनं अत्यंत अप्रिय गोष्ट आहे. प्रवास करून आलेले नाटकाशी संबंधित सर्व जण, प्रयोग वेळेवर सुरू व्हावा आणि योग्य वेळी संपावा यासाठी चाललेली त्यांची धडपड, त्यांची घाईगर्दी यात आपण तिथे कडमडून त्यांच्या कामात व्यत्यय आणणं हा घोर अपराध. हे सगळं स्वत: पाळत असूनही त्या दिवशी मला काय दुर्बुद्धी झाली, ते नटेश्वरच जाणे! मी त्या माझ्या मित्राच्या आग्रहाला बळी पडलो. गेलो बुवा त्याच्याबरोबर. नाटक सुरू होऊन बराच वेळ झाला होता. दुसरा अंक सुरू होता. रंगपटात गेलो. तिथे या नाटकात डॉक्टरची भूमिका करणारे आमचे ज्येष्ठ मित्र मोहन मुंगी एकटेच होते. त्यांनी आमचं स्वागत केलं आणि गप्पा सुरू झाल्या. वास्तविक रंगपटात रंगमंचावर काय दृश्य चाललं आहे, हे ऐकू येण्यासाठी स्पीकर लावलेले असतात. त्यामुळे आपली 'एंट्री' कधी आहे, हे कलाकाराला कळू शकतं. त्या दिवशी नेमके ते स्पीकर बंद होते. बोलता-बोलता मोहन मुंगी एकदम खाडकन उभे राहिले आणि 'अरे बापरे! माझी एंट्री आली वाटतं' असं म्हणत रंगमंचाकडे धावत सुटले. तोवर वेळ निघून गेलेली होती. रिमा रंगमंचावर एकटी उभी. डॉक्टरांचा पत्ता नाही. अखेर उशिरा का होईना, मुंगींनी रंगमंचावर कशीबशी एंट्री घेतली. रंगमंचावर एकही शब्द न बोलता, येणाऱ्या पात्राची वाट बघत उभं राहणं हे काय दिव्य असतं, ते कलाकारच समजू शकतो. विनोदी नाटक असेल, तर काहीतरी बोलून वेळ साजरी करता येते; पण 'घर तिघांचं हवं' यासारख्या गंभीर प्रकृतीच्या नाटकात! छे, केवळ अशक्य!

अंक संपल्यावर रिमा रंगपटात आली ती रागानं लाल होऊनच! तिनं माझ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला आणि गरजली, ''यांना आधी इथून बाहेर काढा!'' त्या अवस्थेत रिमाला 'माझी काहीही चूक नाही' असं सांगण्यात काही अर्थ नव्हता. मी खाली मान घालून मुकाट्यानं बाहेर पडलो.

रिमाची आणि माझी चांगलीच मैत्री होती. 'घो मला असला हवा' या चित्रपटात आम्ही दोघांनी भूमिकाही केल्या आहेत. शूटिंगदरम्यान आम्ही वेगवेगळ्या विषयांवर गप्पाही मारायचो. पण मी कधीही या प्रसंगाचा उच्चारही केला नाही. उगाच आगीत तेल ओतायला नको. 'आठवणींच्या खिडकीतून'च्या निमित्तानं 'घर तिघांचं हवं' या नाटकाची आठवण आणि माझ्या मनातला सल वर आला, इतकंच!

***श्रीराम रानडे***
९८२३१४४७०९

## क...
## कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

### विठू माउली

परवा देवळात गेले
उगा विठू दिसला निवांत
म्हणून जरा बसले
त्याच्या समोरच थेट
हसला थोडा हिरमुसला
निवांतपणा पण नकोसा वाटला
सवयच झाली आता
चोवीस तास भक्तांचा भार वाहण्याची
मीही हसले म्हटले,
मुरलेल्या राजकारण्यासारखे झाले की तुझे
कार्यकर्त्यांची वर्दळ सतत हवी अवतीभवती
निवांत दु:खासुखाचे चार शब्द बोलायला
सापडतोस कुठे हल्ली?
कधी बोलाव्या मनातल्या गुजगोष्टी तुझ्याशी?
काय रे विठोबा,
माझं एक सोड मी चार दिवसांची मैत्रीण तुझी
पण मी म्हणते,
ती तुझी रखुमाई आहे तरी कशी?
इतकी वर्षं निमूटपणे
उभी तुझ्या पाठीशी
तरीही पुन्हा सोबत अशी नाहीच!
तू असा सदा गुरफटलेला
कधी विचारपूस तरी करतोस का तिची?

जगाचा संसार चालवणारा तिचा नवरा
तिच्या संसाराच्या वाट्याला येईल
अशी वाट पाहून
थकली असेल रे बिचारी
कोण रे तिला, तिचं मन मोकळं करायला?
काही भांडावे, काही मांडावे तिने तरी कुणाशी?
जनीसाठी लगेच धावणारा पांडुरंग तू
तुझा रुक्मिणीसाठी जीव मात्र कधी तुटतच नाही
तिला मागे वळून पाहावी तरी एकदा
एवढंसुद्धा तुला कधी वाटतच नाही
भरून आलेले डोळे उगीच
मिटून कोरडे करत हसला
पुन्हा लोभसवाणे विठोबा म्हणाला,
वाटलं होतं एकदाच बघ म्हणावं तिला मागे वळून
नको तिष्ठत राहूस माझ्यापायी
जा तुझी तू पुन्हा तुझ्या स्वर्गलोकी बाई
पण धडाच नाही झाला
जगाचा पसारा सोसवतो मला
ती पाठीशी उभी आहे म्हणून
रुसलेली का असेना पण जवळ आहे म्हणून
आजही हसतो तुझा विठू
तरीही भवती कुणी नसलं की
धावून येतंच एकाकीपण अठ्ठावीस युगांचं
तिच्यापासूनचं तुटलेपण
तुला म्हणून सांगतो
माउली होताना तुमची
मी घेतलं तिचंच सगळं स्त्रीपण...

('देवचाफा' या विद्या पोळ-जगताप यांच्या काव्यसंग्रहातून साभार)

## उद्‌गार

नियतकालिकांचे/
समाजमाध्यमांचे अभिप्राय

# डोईचा पदर आला खांद्यावरी...

*‘डोईचा पदर आला खांद्यावरी...’ या एकंदर कथानकाला सत्तरच्या दशकातील हिंदी चित्रपटांनी रंगवलेल्या वातावरणाची पार्श्वभूमी आहे. या कादंबरीत येणारी द्वंद्वे लक्षात घेण्यासारखी आहेत. कादंबरीचे शीर्षक संत जनाबाईंच्या एका अभंगातून घेतले आहे. केशवासाठी जनाबाईंचा भक्तीचा पदर खांद्यावर आला होता. कोमलचा प्रेमाचा पदर मुकेशसाठी खांद्यावर आला.*

‘डोईचा पदर आला खांद्यावरी...’ ही डॉ. छाया महाजन यांची अगदी अलीकडे प्रसिद्ध झालेली कादंबरी आहे. डॉ. महाजन यांनी कथा, कादंबरी, ललित गद्य, बालवाङ्मय, चरित्र, अनुवाद असे वाङ्मयप्रकार समर्थपणे हाताळले आहेत. ‘डोईचा पदर...’ ही डॉ. महाजन यांची पाचवी कादंबरी आहे. या कादंबरीतील वयात आलेली दोन पात्रे, कोमल आणि मुकेश ही कथानकाच्या केंद्रस्थानी आहेत. दोघे एकमेकांकडे प्रेमाने आकृष्ट होतात. कोमलच्या मैत्रिणींनी मुकेशविषयक प्रेमाचे भूत कोमलच्या मानगुटीवर बसवून दिलेले असते. मुकेशही कोमलकडे ओढला गेलेला असतो. कोमल अनुरक्त व्हावी, यासाठी त्याच्या सुप्तासुप्त हालचाली सुरूच असतात. कोमलने फिजिओथेरपीचे शिक्षण पूर्ण केलेले असते. मुकेश इंजिनीयर असल्याचे कळते. मुकेशचे व्यक्तिमत्त्व दिसायला रुबाबदार असते; शिवाय तो जहागीरदार घराण्यातला असल्याने, त्याच्याभोवती वलय असते. कोमलही रूपवान आहे.

मुकेशच्या जीपला अपघात होतो. त्याचे गळ्याचे हाड मोडते. प्लॅस्टर वगैरे उपचार होतात. प्लॅस्टर काढल्यावर फिजिओथेरपीची गरज असते. यासाठी मुकेशची आतेबहीण कोमलला विचारते. दोघांचे एकमेकांविषयीचे प्रेम परस्परांत मुरलेले असल्याने, ही आयती संधी मिळते. कोमलला मुकेशच्या अपघाताबद्दल वाईट वाटते. कोमल फिजिओची सेवा द्यायला तयार होते. फिजिओच्या निमित्ताने निकटतम येण्याने ते दोघेही मोहात पडतात व विपरित घडते. फिजिओथेरपी आणि शारीरिक क्रिया यांचा सूचितार्थ महत्त्वपूर्ण आहे. त्या विपरित मोहमयी क्षणी कोमलची सेवा

कोलमडते व ती आवर्तात सापडते. याच घटनेचे भांडवल करून मुकेश तिच्याशी विवाहबद्ध होतो. कोमलचे आई-वडील, आजोबा-आजी यांच्या कुटुंबाची कसोटी लागते व ते शरणागत होतात. पुढे कालौघात मुकेशच्या जहागीरदार घराण्याचा पोकळ वासा सर्वांना असहायपणे पाहावा लागतो.

'डोईचा पदर आला खांद्यावरी...' या एकंदर कथानकाला सत्तरच्या दशकातील हिंदी चित्रपटांनी रंगवलेल्या वातावरणाची पार्श्वभूमी आहे. दोघांनी सुंदर असणे, रोमँटिक प्रसंग अनुभवणे, एकमेकांत अडकणे व अडथळ्यांची शर्यत पार पाडत जगणे ही ती पार्श्वभूमी आहे. कोमलच्या आई-वडील, आजी-आजोबा यांच्या कुटुंबाला जी शरणागती पत्करावी लागते, तिचे मूळ समाजव्यवस्थेत आहे. त्या व्यवस्थेला लेखिकेने उघडे केले आहे. या व्यवस्थेत कोमलच्या मनाचा एका तथाकथित जहागीरदार घराण्यात कसा चुरा होतो, हे लेखिकेने कथानकाच्या घट्ट विणीतून वेगवान पद्धतीने कथन केले आहे.

या कादंबरीत येणारी द्वंद्वे लक्षात घेण्यासारखी आहेत. मुकेशचे जहागीरदार घराणे व कोलमचे साधे मध्यमवर्गीय कुटुंब. येथे सामाजिक वर्गीयता शोषक-शोषणाचे रूप धारण करते. कोमलचे सुसंस्कारित, सोशीक, निरहंकारी वागणे व मुकेशचे बेदरकार, भावनाशून्य व पुरुषी अहंकार जोपासणे हीदेखील वर्गीय द्वंद्वातून जन्मलेली रूपे आहेत. 'मनवा' हे कोमलचे दुसरे मन म्हणून कल्पिलेले अदृश्य पात्र. प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ सी. जी. युंग यांच्या मानसशास्त्रीय परिभाषेत सांगायचे, तर वृद्ध आप्त किंवा ओल्ड वाइझ मित्रासारखे आहे. हे पात्र सल्ला देते, जागे करते, इशारा देते वगैरे. 'मनवा'सारख्या पात्रनिर्मितीचा लेखिकेचा प्रयोग अभिनव आहे.

कादंबरीचे शीर्षक संत जनाबाईंच्या एका अभंगातून घेतले आहे. केशवासाठी जनाबाईंचा भक्तीचा पदर खांद्यावर आला होता. कोमलचा प्रेमाचा पदर मुकेशसाठी खांद्यावर आला. वस्तुतः दोघेही प्रेमार्त होते; पण कोमलची चूक हे तिचे भागधेय व ते तिने आयुष्यभर भोगावे, हे सामाजिक सत्य अधोरेखित करण्यासाठी लेखिकेने हे शीर्षक दिले आहे. समाजसंकेत तसा नसता, तर 'डोईची पगडी आली खांद्यावरी...' असे काहीतरी शीर्षक दिले असते. कादंबरीची भाषा कोमल आणि मुकेश या दोघांच्या कुटुंबव्यवहाराला समर्थपणे पेलणारी व भारदस्त आहे.

***डॉ. दिलीप धोंगडे***

(*महाराष्ट्र टाइम्स*, संवाद पुरवणी, २८ जानेवारी २०२४मधून साभार)

# राजहंसी पार

काय घडलं
'राजहंसी' नगरीत?

## मेड इन चायना : अनौपचारिक प्रकाशन




डावीकडून : गिरीश कुबेर, दिलीप माजगावकर, रेखा माजगावकर,
शर्मिष्ठा कुबेर, डॉ. सदानंद बोरसे

## गोंदणखुणा : प्रकाशन




डावीकडून: डॉ. सदानंद बोरसे, प्रिया निघोजकर, मानसी मागीकर, हेमकिरण पत्की

‘राजहंस प्रकाशन’ प्रकाशित ‘गोंदणखुणा’ या डॉ. प्रिया निघोजकर यांच्या ललित लेखसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ अभिनेत्री आणि लेखिका डॉ. मानसी मागीकर यांच्या हस्ते दि. १८ मे २०२४ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ‘माधवराव पटवर्धन सभागृहा’त संपन्न झाले.

प्रारंभी ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. चंद्रशेखर बर्वे यांनी आशीर्वादपर आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी कवी हेमकिरण पत्की यांनी लेखिकेच्या पुस्तकाची बलस्थाने, सौंदर्यस्थळे उलगडवत मराठी ललित लेखसंग्रहांच्या परंपरेत मौलिक भर घालणारे हे पुस्तक ठरेल, असे प्रतिपादन केले.

‘राजहंस प्रकाशना’चे डॉ. सदानंद बोरसे यांनीही काव्यात्म शैलीत पुस्तकाचे अंतरंग, त्यांतील कलात्मक, रेशीम पोत असलेली वाक्यरचना सांगत पुस्तकाचे मर्मग्राही रसग्रहण आपल्या मनोगतातून मांडले. मा. विद्या बेलसरे यांनी लेखिकेच्या समग्र अभिव्यक्तीचाच आलेख आपल्या हृद्‌गतातून मांडला.

‘‘बालपणीच्या निरागस आठवणींना तत्त्वचिंतनाचे नवे कोंदण आपल्या लेखनाच्या माध्यमातून लेखिका डॉ. प्रिया निघोजकर यांनी दिले आहे. त्यांचे लेखन मराठी वाचकाला एक विचार आणि नवा दृष्टिकोन देणारे आहे. ‘गोंदणखुणा’ हे केवळ पुस्तक नाही, तर निसर्गाकडे पाहण्याची कलात्मक दृष्टी देणारा दस्तऐवज आहे. बालपणीच्या आठवणी सोबत घेत आपलाच आपल्याशी संवाद घडवणारे सुंदर आत्मचिंतन आहे.’’ असे डॉ. मागीकर प्रकाशनानंतर म्हणाल्या.

ज्येष्ठ कवी हेमकिरण पत्की, राजहंस प्रकाशनाचे प्रमुख मा. दिलीप माजगावकर, मा. रेखा माजगावकर, मुख्य संपादक डॉ. सदानंद बोरसे, प्रा. डॉ. चंद्रशेखर बर्वे, नाट्यकर्मी श्रीराम रानडे, चित्रकार रविमुकुल, रजनीश जोशी, श्याम भुर्के, चिंतामणी पटवर्धन, हनुमंत कुबडे आदी मान्यवरांसह अनेक मराठी रसिक वाचक या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अक्षय वाटवे आणि मानसी मागीकर यांनी पुस्तकातील चार लेखांचे या वेळी अभिवाचन केले. डॉ. निघोजकर यांनी प्रास्ताविकात लेखन आणि पुस्तकनिर्मितीच्या आठवणींना उजाळा दिला. अक्षय वाटवे यांनी सूत्रसंचालन केले.

❖

## सायबर ॲटॅक : अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून : तृप्ती देशपांडे, शिरीष सहस्त्रबुद्धे, सुधीर साबळे, दिलीप माजगावकर, डॉ. सदानंद बोरसे

## सवाष्ण : प्रकाशन



डावीकडून : विलास गोवर्धने (कवी आकाश), डॉ. संजय शेलार, डॉ. क्षमा शेलार, रवींद्र गुर्जर, निलेश ओक, शिरीष सहस्त्रबुद्धे

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




पालकांनी मुलांशी संवादासाठी सुरू केलेलं बोलणं
हमखास विसंवादाचं वळण घेतं. हा तिढा सोडवायचा कसा?
प्रक्रिया सोपी नाही, पण प्रयत्नसाध्य नक्की आहे.
त्यासाठी सादर आहे एका बालरोगतज्ज्ञ
समुपदेशिकेचे अनुभवाचे बोल...

### प्रिय पालक

अडनिड्या वयातल्या मुलांच्या आईबाबांशी संवाद

डॉ. वैशाली देशमुख

किंमत : ₹ ३२०/- । (ट.ख. ₹ ५०)

'कितीही अडचणी, वाईट प्रसंग आले, तरी डरायचं नाही'
असा संदेश देणारी वेलवर्गीय वनस्पती - 'दौशाड'!
तिचाच आदर्श घेऊन माणदेशातील माणसं हिमतीनं
जगत असतात. त्यांची कहाणी सांगणारं...

### दौशाड

डॉ. नंदकुमार राऊत

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)







बाईच्या संघर्षमय जगण्याचं चित्रण मराठी कादंबरीला नवं नाही.
पण बायकांचा समूह मात्र क्वचितच कोणी रंगवला...
एका लहानशा खेड्यातला बायकांचा समूह ओघवत्या
भाषेत नि चित्रमय शैलीत रंगवणारी कादंबरी...

### बाय गं... सामान्य स्त्रीचे सामान्य जनजीवन

विद्या पोळ - जगताप

किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)



# वाचकांच्या मनातलं...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## सीता

'रामायण' हा अलीकडे सगळ्यांचाच आवडता विषय. अगदी घरापासून ते राजकीय, सामाजिक वर्तुळात रामायण हा विषय चर्चेत असतो. आजवर रामायण आपण टीव्ही, सिनेमा, नाटक, कथा, कादंबऱ्या अशा सगळ्या माध्यमांतून अनुभवलं आहे. प्रत्येक ठिकाणी राम आणि रावण यांना केंद्री ठेवून रामायण आपल्यासमोर सादर होतं. मग ओघानं लक्ष्मण, सीता, हनुमान, वानरसेना, काही महत्त्वाच्या दंतकथा अशा गोष्टी येतात.

आजवर आपण रामाच्या किंवा रावणाच्या दृष्टिकोनातून रामायण बघत आलोय. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध पैलू विविध पद्धतींनी आपल्यासमोर येतात. यात एक गोष्ट सगळीकडे सारखी असते. ती म्हणजे 'सीते'चं व्यक्तिचित्र. सीता कायमच हतबल, अबला अशी दिसते. तिला तसंच दाखवलं जातं. पण सीता खरंच अशी असेल का, हा प्रश्न नेहमी पडायचा. याचं खणखणीत उत्तर मला अभिराम भडकमकर यांच्या 'सीता' कादंबरीमध्ये मिळालं.

सीतेच्या नजरेतून रामायण कसं दिसेल, याचं उत्तम उदाहरण म्हणजे ही कादंबरी आहे. कादंबरीच्या प्रत्येक प्रसंगात सीतेची ताकदीची निर्णयक्षमता दिसून येते. अगदी स्वयंवरापासून ते वनवासात जाईपर्यंत. यात तिची राजनीती, कूटनीती, धर्माबद्दल असलेली आकलनशक्ती, राज्यकारभाराविषयी तिची तत्त्वं, स्वधर्माविषयीची तिची भूमिका आपल्यासमोर स्पष्ट होते. कादंबरीमध्ये एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख आहे, तो म्हणजे नियती आणि कर्म. या दोन गोष्टी वाल्मिकी रामायण लिहीत असताना सीतेच्या मार्फत आपल्याला समजावून सांगतात. या दोन्ही गोष्टी एकमेकांना कशा पूरक आहेत किंवा त्यांचा संबंध जोडून सीता निर्णय घेते. या सगळ्या वर्णनांमध्ये सीता किती सामर्थ्यवान होती, हे दिसून येतं. कारण अनेक वेळा कर्मानं नियतीवर मात केली असली, तरी ती अनेक प्रसंगांना तितक्याच ताकदीनं सामोरी

गेल्याचं दिसतं. म्हणजे अगदी रावणाची कैद असो किंवा अग्निपरीक्षा, ती कुठेही विचलित न होता सगळ्याला सामोरी गेली. धर्म-अधर्म, युद्ध, राजकारभार, लोकांचा विचार या सगळ्यांना पूरक अशी आध्यात्मिक आणि तार्किक बुद्धी सीतेकडे होती, हे आपल्याला समजतं.

आपल्या आजकालच्या सामाजिक वातावरणात अशा कथानकाची गरज आहे. रामराज्य म्हणजे नेमकं काय, या प्रश्नाचं उत्तरदेखील यात आहे. आजचे स्त्रीवादी सीतेला दुर्बल समजतात. त्यामुळे कधीही सीतेची ही बाजू आपल्यासमोर आली नाही. सीतेचे विचार व्यापक होते. तिनं कायमच तार्किक विचार मांडले. हे विचार स्वबळाचे, स्वावलंबनाचे आहेत. ते विचार रामराज्याचे आहेत. पण नेमके हेच विचार कायम झाकून ठेवले जातात. हेच खरं दुर्दैव म्हणावं लागेल.

'सीता' कादंबरीमधून आपल्यासमोर उभं राहणारं सीतेचं चरित्र, व्यक्तिमत्त्व आपल्याला विचार करायला भाग पाडतं. रामायणाचं वैचारिक महत्त्व आज टिकून आहे आणि त्यात सीतेचं फार मोठं योगदान आहे, हे या कादंबरीतून प्रत्यक्ष समोर येतं. यातले सीतेचे वैचारिक संवाद कमालीचे जमून आले आहेत. काल्पनिक पात्ररचनाही उत्तम आहे. ती पूरक आहे. सीतेचं खरं चरित्र समजून घ्यायचं असेल, त्याचबरोबर तिची अद्वितीय वैचारिक क्षमता अनुभवायची असेल, तर 'सीता' वाचलीच पाहिजे.

***सुमित*** *यांच्या फेसबुकवरून साभार*

## आयफेल

'आयफेल' वाचले. दोनअडीच तासांत सलग वाचून झाले, इतके ओघवते आहे. मस्त. टॉवर, त्याच्या बांधणीचा इतिहास, त्यात गुंतलेला गुस्तावभोवतालचा जगभरच्या कर्तृत्ववानांचा गोतावळा, टॉवर पुरा झाल्यानंतर आर्थिक लाभाव्यतिरिक्त



कशी होती सीता? विचारी आणि खंबीर?
की हतबल आणि भावुक?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या
सीतेच्या विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...
सीता
अभिराम भडकमकर
आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३७५/- । (ट. ख. ₹ ५०)

बाबींपासून गुस्तावचे लांब राहणे, अनपेक्षित आणि अकारण बदनामीनंतरही मनात कटुता न येऊ देता निरीच्छपणे दुसऱ्या मौलिक कामांत गुंतणे यांतला हृद्य मानवी भाग चांगला आणला आहे. टॉवरच्या बांधकामातल्या तांत्रिक बाबी क्लिष्ट न होता, एरवी मी स्वत: इंजिनीयर असूनही अशा मजकुरात पाने पलटतो, पण सरळ-सोप्या शब्दांत पोहोचवण्याची तुमची धडपड कौतुकास्पद आहे.

अलीकडेच आलेली किरण गुरव यांची ‘जुगाड’ ही कादंबरी वाचनात आली आहे का तुमच्या? आत्मचरित्रात्मक संदर्भ असलेल्या या अप्रतिम कादंबरीतला नायकही पदविकाधारक अभियंता आहे. त्यातला त्याचा नंतरचा स्थैर्यासाठीचा संघर्ष गुरव तपशिलांत जरतारी विणकाम असावे तसा रंगवतात, तरी त्यात शेवटाकडे एक तांत्रिक मशीन उभारणीचा भाग आहे. त्याचे तांत्रिक बारीकसारीक तपशील इतके विस्ताराने आलेत की, ही बारा-पंधरा पाने वाचणे अवघड झाले. कथानकात गुंतल्याने स्किप करून पुढेही जाववेना. कथानकाशी त्याचा सांधा कुठे न् कसा जोडणार, हेही कळेना. मी या कादंबरीवर एक टिपण लिहिले होते. त्यात हे टाळायला हवे होते याचा उल्लेख केला होता. तुमच्या पुस्तकात असे झालेले नाही. ते कथात्म नाही त्यामुळे, तसेच तुम्ही इंजिनीयर असूनही ‘ज्ञानप्रदर्शना’चा सहज मोह टाळलात हे चांगले झाले. अर्थात त्यातल्या भव्यतेची, आज सहजशक्य वाटणारे तांत्रिक शोध तोवर लागलेले नसल्याने उभारणीतल्या आव्हानांची कल्पना येणेही आवश्यक होते. तो तोल तुम्ही चांगला साधलात.

आजूबाजूच्या इतिहासाने अशा व्यक्ती, घटनांची त्या काळातली स्थाननिश्चिती करता येते, तेही तुम्ही केले आहे. दुसऱ्या महायुद्धादरम्यानचा तपशील थोडा ‘आउट ऑफ सिलॅबस’ आहे असे सुरुवातीला वाटले, तरी नंतर ते आवश्यक होते हे लक्षात आले.

आयफेल हे त्याचे कूळनाव, त्यामुळे त्याचा उल्लेख पुस्तकात गुस्ताव नावाने व्हायला हवा होता. तसेच दोन्ही मुलांनी त्याचा बौद्धिक वारसा न चालवता त्याचे नाव खराब होईल असेच वर्तन केले, असे सुरुवातीच्या भागात सूतोवाच आहे, त्याचा

‘इंजिनीयरिंग मार्व्हल’ म्हणजे आयफेल टॉवर. तो साकारणाऱ्या प्रतिभावान अभियंत्याचे अनेक चढउतारांनी भरलेले, यशोमालिकांनी रंगलेले अन् लोकापवादांनी माखलेले आयुष्य चितारणारे चरित्र!

आयफेल

सत्यजीत साळवे

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)



संदर्भ शेवटाला हवा होता थोडक्यात तरी. आवश्यक नाही, पण सुरुवातीलाच तुम्ही सांगितलेत त्याची पुष्टी होत नाही.

असो, सध्या लेखनप्रकल्पात व्यग्र आहे, त्यामुळे हा थोडक्यात अभिप्राय दिला आहे. चांगले, निर्मितीदृष्ट्याही वजनदार पुस्तक दिलेत, यासाठी अभिनंदन.

***नितीन वैद्य***

## किमयागार कार्व्हर

आदरणीय वीणाताई गवाणकर,

आपण लिहिलेलं 'एक होता कार्व्हर' हे पुस्तक काही वर्षांपूर्वी वाचलं होतं.. त्यानंतर लहानग्या मुलांसाठी लिहिलेलं 'किमयागार कार्व्हर' हे पुस्तक वाचण्यात आलं. मी एका आदिवासी आश्रमशाळेमध्ये शिक्षक म्हणून काम करतोय.. म्हणून माझ्या नववीच्या वर्गातील मुलांसाठी 'किमयागार कार्व्हर' या पुस्तकाचं अभिवाचन केलं. महाराष्ट्रातल्या प्रत्येक पालकानं आपल्या मुलाला वाचून दाखवावं असं हे पुस्तक आहे... अठराव्या शतकात टोकाचा असलेला वर्णभेद, अशा वर्णभेदांमध्ये काळ्या समाजात (अर्थात तिकडचा आदिवासी समाज) जन्माला आलेला जॉर्ज... दुर्दैवानं आई आणि वडील या दोघांचंही छत्र हरवलेलं. जगाच्या कुठल्याही टोकावर जा, थोडीफार का होईना माणुसकी जिवंत असतेच, म्हणून सुजन आणि मोजेस कार्व्हर यांनी ह्या मुलाला लहानपणी वाढवलं. गरिबीशी, अन्यायाशी संघर्ष करणाऱ्या या लहानग्या जॉर्जला त्याच्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनं प्रोत्साहन दिलं. प्रसंगी योग्य मार्गदर्शनही केलं. लहानपणात शिक्षणासाठी संघर्ष करणारा जॉर्ज स्वत:च्या कर्तृत्वानं, हिमतीनं, चिकित्सक बुद्धीनं पीएचडीची संधी निर्माण करतो.



लहानपणापासून त्याला जगानं वेळोवेळी नाकारलं,
अडवलं. त्याला अनेक संकटांना तोंड द्यावं लागलं.
तरीही त्यानं संपूर्ण मानवजातीसाठी
अनमोल काम केलं.

एक होता कार्व्हर

वीणा गवाणकर

आवृत्ती अठ्ठेचाळिसावी । किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ४०)

आणि आता असं वाटतं, की आता जॉर्जचं आयुष्य सुखासीन होईल. परंतु आयुष्याला एक वेगळंच वळण लागतं. स्वत:चा विचार करता-करता, ज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगायचं झालं, तर 'दुरितांचे तिमिर जावो' असा विचार जॉर्जच्या मनात येतो. म्हणून सगळं ऐश्वर्य समोर दिसतानासुद्धा हे सर्व सोडून जॉर्ज आलाबामा राज्यातल्या टस्किगी या आपल्या गावात येतो. तिथल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काम करतो. नि:सत्त्व झालेल्या जमिनीमध्ये सत्त्व निर्माण करतो. आणि आपल्या काळ्या बांधवांना मोठं करतो. स्वत:चा विचार करता करता समाजाचा, बांधवांचा आणि देशाचा विचार कसा करावा, हे नकळतपणे जॉर्ज या पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांना सांगतोय. पुस्तक नुसतं चरित्र नाही, तर वाचकाच्या अंत:करणात राष्ट्राबद्दल प्रेम, आपुलकी निर्माण करणारी एक ज्योत आहे. ही ज्योत उद्याच्या भारतातील लहानग्यांच्या हृदयात या पुस्तकाच्या माध्यमातून आपण पेटवली आहे. आपले मनापासून धन्यवाद...

**_विराज घरत_**
माध्यमिक शिक्षक, अनुदानित आश्रम शाळा तळवली, ता. मुरबाड जि. ठाणे


**मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांवरील पुस्तकांविषयी**

- मेड इन चायना — किंमत : ₹ ४५०/-
  गिरीश कुबेर
- चंद्रशेखर — किंमत : ₹ ३८०/-
  अनु. अंबरीश मिश्र
- व्याकुळ पिंपळ — किंमत : ₹ १२०/-
  हिमांशु कुलकर्णी
- दंवभिजली वही — किंमत : ₹ १२०/-
  हिमांशु कुलकर्णी
- अजान आणि चालिसा — किंमत : ₹ १५०/-
  मुबारक शेख
- किमयागार कार्व्हर — किंमत : ₹ १५०/-
  वीणा गवाणकर
- George Carver The Magician — Price : ₹ 200/-
  Veena Gavankar । Trans. by: Shirish Sahasrabuddhe

कधी न गळणारा

**'राजहंसी' मोहोर**

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,

त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**'राजहंस ॲप'**

App Store — आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play — अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी

तुम्ही 'राजहंस'ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com



## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अप्रुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.




निवडुंगातून फूल यावे तसे
कवीच्या काटेरी अनुभवाला आलेले
करुणेचे फूल या कवितांना साद घालते.
कवीची भाषा करुणेचा स्वर लाभलेली
सत्याची भाषा आहे.

**मंगेश पाडगावकर**

## व्याकुळ पिंपळ
हिमांशु कुलकर्णी

हिमांशु कुलकर्णी यांच्या कवितेचा प्रकृतिधर्मच असा आहे की,
स्वत:शीच हळुवारपणे गुणगुणल्यासारखी ती व्यक्त होते.

हा प्रकृतिधर्म म्हणजे तिचे खानदान आहे.
या प्रकृतिधर्माशी सुसंगत अशी सूचकता
त्यांच्या कवितेत अगदी स्वाभाविकपणे आली आहे.

**मंगेश पाडगावकर**

## दंवभिजली वही
हिमांशु कुलकर्णी







अनिष्ट प्रथा, कर्मठता, शोषण,
अज्ञान अन् दारिद्र्य
यांत पिचत असलेल्या
समाजाच्या प्रगतीसाठी
उमटलेला संवेदनशील सूर.

## अजान आणि चालिसा
मुबारक शेख

Registered
Rajhans Granthavedh
(REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO,Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48

बाळगोपाळांसाठी लाडका ‘कार्व्हर’ मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये...







किमयागार कार्व्हर

George Carver The Magician

वीणा गवाणकर
चित्रे : माधुरी पुरंदरे

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक ‘राजहंस’ प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**